
# आशा पाटील



# एकटी

# एकटी

आशा पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान

# एकटी

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटं

१ मिनिट : हे पुस्तक तुम्हाला कसे वाटले ते लेखिकेला कळवा.

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

एकटी (कथासंग्रह)

पत्ता- सौ.आशा अरूण पाटील

साईराम न्यू सी ४२३/ ४२४ सिंधू विहार

विजापूर रोड जुळे सोलापूर सोलापूर

४१३००८

संपर्क क्रमांक ९४२२४३३६८६

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १८ डिसेंबर २०१७

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# *अंतर्मुख करणारा कथासंग्रह : एकटी*

गोष्टी सांगणे किंवा गोष्टी ऐकणे या प्राचीन परंपरेतून कथेचा विकास होत गेलेला आहे. लहान - थोर कोणीही असो गोष्टी सगळ्यांनाच खूप आवडतात. मराठीमध्ये तर गोष्ट सांगण्याची पद्धत खूप जूनी आहे. तशीच कथा लेखनाची परंपराही मराठीमध्ये खूप मोठी आहे. अगदी महानुभाव पंथातील दृष्टांतापासून हा वारसा चालत आलेला आहे. चक्रधर स्वामींनी सांगितलेले दृष्टांत या कथाच होत्या. या दृष्टांतापासून ते अलिकडेच कथालेखनासाठी ज्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला ते जयंत पवार यांच्यापर्यंत मराठी कथाविश्व समृद्ध झालेलं आहे. मराठी कथालेखनाचा हा समृद्ध वारसा पुढे चालवण्याचा प्रयत्न करणाऱ्या कथालेखिका आशा पाटील यांचा 'एकटी' हा कथासंग्रह ई बुक स्वरूपात प्रकाशित होतोय ही निश्चितच आनंदाची गोष्ट आहे. आजच्या तंत्रज्ञानाला वश केलेल्या पिढीसमोर कवि-लेखकखंनीही त्यांच्याच माध्यमातून त्यांच्यापुढे गेले पाहिजे. हे नेमके परिवर्तन लक्षात घेऊन मा. आशा पाटील या नव्या माध्यमातून आपल्यासमोर येत आहेत. आपण त्यांचे स्वागत केले पाहिजे.

कथालेखिका आशा पाटील यांना कथालेखनाचे नेमके वर्म सापडले आहे. वाचकाला गुंतवून ठेवणे हे भल्याभल्या लेखकांना जमत नाही. पण आपल्या लेखनाच्या बळावर त्या वाचकांना कथावाचनामध्ये गुंतवून ठेवण्यात यशस्वी झाल्या आहेत. ओघवती भाषाशैली आणि उत्कंठावर्धक प्रसंगांची गुंफण यामुळे वाचक कथेत गुंतत जातो. वास्तववादी कथा हे आशा पाटील यांच्या कथालेखनाचे एक वैशिष्ट्य आहे. या संग्रहातील सर्वच कथा या वास्तववादी कथा आहेत. नुसतेच स्वप्नरंजन किंवा आभास निर्माण करणाऱ्या या कथा नाहीत. तर वास्तवाचे भान आणून देवून वाचकाला विचार करायला लावणाऱ्या या कथा आहेत. वाचकाला

अंतर्मुख करायला लावणाऱ्या या कथा आहेत. 'रकमा' या कथेतील धुणी भांडी करणारी रकमा व तिची मुलगी यांची कथा प्रेरणादायी अशी आहे. प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या मुलीला जिद्दीने शिकवणारी रकमा मनात घर करून राहते.

या संग्रहातील 'आभास' ही कथा तर मनाला चटका लावणारी आहे. चित्रदर्शी अशी ही कथा आहे. ती वाचत असताना एखादा चित्रपट आपल्या डोळ्यासमोरून सरकावा अशी ही कथा पुढे पुढे सरकत जाते. या कथेची नायिका संयुक्ता हिची मनोवस्था अतिशय प्रभावीपणे लेखिकेने रेखाटली आहे. संयुक्ताच्या मनोवस्थेत वाचकही गुंतत जातो. तिच्या भावविश्वाशी एकरूप होतो. वाचकाच्या ह्रदयाचाही ठोका चुकतो. पण कथेच्या गोड शेवटामुळे वाचकही संयुक्ताएवढाच आनंदी होतो.

या सगळ्या कथांमधील घटना भराभर पुढे सरकत असल्याने यामध्ये एक गती आहे जी वाचकाला इकडे तिकडे हलू देत नाही. त्यामुळे या सगळ्या कथांचा विस्तार केला तर प्रत्येक कथेवर एक कादंबरी होऊ शकते. आणि प्रत्येक कथेवर एखादी शॉर्टफिल्म तर नक्कीच होऊ शकते.

'अट्टाहास' या कथेतून गर्भलिंग निदान चाचणीचे वास्तव अधोरेखित करण्यात लेखिका यशस्वी झाल्या आहेत. सुनंदाची घालमेल आणि ठाम निश्चय अगदी परिणामकारकपणे उतरला आहे.

या संग्रहातील आणखी एक मनाला चटका लावून जाणारी कथा म्हणजे 'एकटी'..! या कथेतील केतकी व तिच्या वाट्याला आलेले आयुष्य यामुळे वाचक अस्वस्थ होतो. ही कथा अतिशय प्रभावी शैलीत उतरली आहे. एक स्त्री म्हणून घरात कितपत स्वातंत्र्य मिळते, स्वतःच्या आयुष्याचा निर्णय देखील तिला स्वतःला घेता येत नाही हे अजूनही आपल्या समाजातील वास्तव आहे. हे या कथेतून सुरेखपणे लेखिकेने मांडले आहे.

कुठलाही विषय लेखिकेला वर्ज्य नाही. 'फसवणूक' या कथेत व्यापारातील फसवणूक तर 'जबाबदार कोण?' या कथेत दंगलीचा विषय हाताळला आहे. तोही अगदी सफाईदारपणे..!

'पतंग' या कथेत बालकांचे भावविश्व रेखाटताना 'पतंगाची दोरी आपल्या हातात असते पण आपल्या जीवाची दोरी परमात्म्याने पकडून ठेवलेली असते.' हे एक सुंदर वाक्य लेखिका सहज लिहून जातात.

या संग्रहातील सर्वच कथा वाचनीय आणि दीर्घ काळ लक्षात राहणाऱ्या आहेत.

या कथांमधील रकमा, केतकी, राणी, शिर्के मॅडम, सुनंदा या स्त्री व्यक्तीरेखा आपले पारंपरिक जगणे, संस्कृती यांना सोबत घेऊनच आपल्या परीने प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड करणाऱ्या आहेत. म्हणून वाचकांना त्या पटकन भावतात. या कथा सर्वच थरातील वाचकांना आवडतील यात शंका नाही. आशा पाटील यांचे अभिनंदन व शुभेच्छा...!

- बालाजी मदन इंगळे

मो. 9881 823 833

balajimingale@gmail.com

मला सृजनाच्या वाटेवर

नेहमी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देणारी

माझी दोन मुलं आदेश व ओम यांना अर्पित

आशा पाटील

# कथानुक्रम


रकमा

पतंग

जबाबदार कोण?

फसवणूक

आभास

अट्टाहास

एकटी

# रकमा

आज माझ्यासाठी खूप महत्त्वाचा दिवस होता. शाळेत वार्षिक तपासणी आणि घरी पाहुण्यांचे आगमन. सकाळपासून आज मला कससंच होत होतं. आपल्याकडे "अतिथी देवो भव" ही संस्कृती आहे. पण आज मात्र माझी या सर्वांमध्ये तारेवरची कसरत चालली. कसरत कसली अहो, तारांबळ चालली होती. मला मात्र तिची राहून राहून आठवण यायला लागली. तिनं कमीत कमी आदल्या दिवशी मला कल्पना द्यायला हवी होती. खरं तर माझ्या महत्त्वाच्या दिवशी तिनं इतका वेळ लावायचा हेच योग्य नाही. या सर्व स्वगतभाषणामध्ये अचानक संगिताची भर पडली. माझा मोबाईल वाजत होता. 'दुष्काळात तेरावा महिना' असं पुटपुटतच 'आणि आता कोण'या भावनेनेच मी फोन उचलला. आवाज तर ओळखीचा होता. 'अवं बाईसाहेब आज मला लय महत्त्वाचं काम हाय. आज अन् उद्या मी याची नाय.'

'अगं पण का?'

'अवं बाई माझी कमला मामलेदार झालीया. फर्मान निघालया. मी तुमच्यासाठी परवाच्याला पेढे आणती. '

एवढं म्हणून मी काही बोलण्याच्या आत तर तिने फोन ठेवलासुध्दा. माझ्या डोक्यात विचारांच काहूर माजलं होतं. ही रकमा आमची कामवाली. आमच्या घरी अन् सोसायटीत पंचवीस वर्षापासून कामाला आहे. पंचवीस वर्षापूर्वीच व्यसनामुळं तिचा नवरा गेला. तेव्हापासून तिनं कामाला सुरूवात केली. तिच्या अंगी जिद्द, ध्येय, चिकाटी अन् आपल्या कामावरची श्रध्दा हे गुण वाखाणण्यासारखे होते. तिनं पोराला व्यसनापासून दूर ठेवल होतं. स्वत:च्या पोरी

व पोराला चांगलं वाढवायचं तिनं ठरवलं होतं. अन् तसल्या बिकट परिस्थितीतही तिनं पोरांना शिकवायचं ठरवलं. अन् मग तिनं कामासाठी पदर खोचला. पोराला दहावीपर्यंत शिकवून कारखान्यात कामाला लावलं. तर पोरगी थोडी फार शिकून अंगणवाडीच्या बाईंच्या हाताखाली मदतनीस म्हणून जात होती.

काही वर्षापूर्वीच तिनं थाटामाटानं मुलाचं अन् मुलीच लग्न लावून दिलं. खरंच, पोरांना बाप नाही, असं वाटू नये म्हणून मोठ्या हौसेमौजेने तिनं लग्न लावून दिलं. सगळं कस आनंदात चाललं होतं. दिल्या घरी पोरगी खुश होती. तर आपल्या संसारात पोरगं रमलं होतं. तिच्यासमोर आता चिंतेचं कारण नव्हतं. त्यांच्या सुखात ती सुख मानत होती.

पण म्हणतात ना, दुखाःनंतर सुख अन् सुखानंतर दुखः हे जीवनचक्र असते. त्यातून कुणीही सुटत नाही. लग्नाला अवघं एक वर्ष झालं झालं होतं. त्याआधीच अपघाताच्या रूपानं काळानं रकमाच्या पोरावर झडप घातली. अन् गरोदर बायको आईच्या पदरात टाकून पोरानं या जगाचा कायमचा निरोप घेतला.

आभाळ फाटलं नव्हतं फुटलंच होतं तिच्यासाठी. तरीपण न डगमगता तिनं आपल्या मायेच्या पदराखाली आपल्या मायेच्या पदराखाली आपल्या आपल्या सुनेला जपायचं. तिच्यातला आपल्या लेकाचा अंश जपायचा ठरवलं होत रकमानं. डोळ्यातलंपाणी आटायच्या आत रकमा पुन्हा कामाला हजर झाली. शेजारणी काही कमी नव्हत्या रकमाच्या. अगं रकमा, काय तू अन् काय काय तुझं नशीब ? अगं आता लय इषाची परीक्षा घेऊ नगसं. जा अन् डॉक्टरीन बायकडून तपास पोरगं हाय का कार्टी असली तर...

रकमा मात्र ठाम होती, तिच्या निर्णयावर. शेजारणींच्या प्रश्नांना योग्य ती उत्तरे देऊन शांत करायची. माझ्याच्यानं असलं पाप व्हायचं नाही, कितीबी झालं

तरी माझ्या लेकाचा अंश आहे तो. आपणच आपल्या पायावर धोंडा कसा मारायचा. आपली लेक कुणाचीतरी सून हायच की. तशा शेजारणी गप्प व्हायच्या.

रकमानं तिच्या हिमतीवर सुनेचं बाळंतपण केलं, कन्यारत्न झालं. तरी नाराज न होता आपल्या लेकाचा अंश म्हणून आनंदाने तिने स्वागत केले. आपल्या नातीला मोठ्ठ करण्याचं स्वप्न मनी धरून ती आता काम करत होती. दिवसामागून दिवस जात होते. आज तिनं सुनेलाही कामाला लावलं. आजी अन् आई मिळून हिमतीनं नात म्हणजे कमलाला शिकवलं. बापापेक्षा जास्त शिकवायचं पोरीला असं ठरवलं होत दोघींनी.

त्यांच्या इच्छेला कमला पण प्रयत्नरूपी साथ देत होती. तिचा प्रत्येक वर्गात पहिला नंबर यायचा. या तिच्या गुणांची पारख तिच्या गुरूंनी केली. अन् तिला योग्य तिथं मार्गदर्शन केलं. आज ती प्रयत्नरूपी पायऱ्यावरून यशाच्या शिखरावर चढली होती. चिखलातून सुंदर कमळ उगवतं हे तिनं सिध्द केलं होतं. हिरा आपल्या तेजाने कुठेही चमकतो, हे तिनं स्व-अस्तित्वातून जगाला दाखवून दिलं होतं. आपल्या आईचं आणि आजीचं स्वप्न तिनं सत्यात उतरवलं होतं. आईच्या दु:खात हा सुखाचा किरण जगण्याची आशा निर्माण करत होता. तर आजीला वाटत होत, 'आजचा दिस बघायाचं म्या आतापातूर जिती राईली.'

दोघींच्याजीवनाचं सार्थक झालं. तिघींच्याही आनंदाला सीमा उरली नव्हती. रकमाच्या ध्येयासक्तीला सलाम. तिच्या सुनेचं व नातीचं कौतुक करायला शब्द अपुरे पडत होते. खरंच मुलगा-मुलगी समान मानले पाहिजेत. या सर्व विचारांनी माझं मन व डोळे भरून आले. माझ्यासमोर माझ्या दिवसभराच्या कार्याचं नियोजन त्या आनंदाश्रूत तरळू लागलं.

रकमा, तिची सून व कमला यांच्या प्ररणेने मी काम करण्यासाठी कमरेला पदर खोचला.

# पतंग

' ए कटली रे कटली,'

'पकड पकड.'

'अरे आम्ही काटली तुम्ही मध्ये यायचं नाही"

एकच गलका करत मुले पळत होती. पतंग गल्लीच्या मधल्या रस्त्यावर उडवत होते. पण पतंग कटल्यावर मात्र ती वाऱ्यावर मोठ्या रस्त्याच्या दिशेने खाली खाली येऊ लागली. मुलं 'ती पतंग आमची, आमच" म्हणून पळू लागली.

बघता बघता मुलं दुचाकीला जाऊन धडकली. खरंतर चूक मुलांचीच होती. तरीही बाकीच्या लोकांनी गोंधळ सुरू केला. बघता बघता रस्त्यावर शंभर दिडशे लोक जमा झाले. अन् गोंधळ मारामारी काहीच समजेना. धडक बसलेल्या गाडीवर सगळे तुटून पडले होते. परंतू चूक कोणाची हे काही कोणी लक्षात घेईना.

शेवटी एका वयस्कर व्यक्तीने पुढाकार घेतल्याने त्याच्या वयाचा, अनुभवाचा आदर म्हणून पुढील सर्वजण जरा शांत झाले. धडक बसलेला मुलगा तर केव्हाच पतंग घेवून पळाला होता आणि बाकीचे सर्व गायब. पतंग पकडण्यासाठी आलेल्या मुलाच्या दोन्ही गटांनी पळ काढला. येथून पुढे आपण आपल्या मुलांना मैदानावर पतंग उडवण्याची परवानगी द्यायची. इकडे तिकडे रस्त्यावर फिरू नये. अशा सूचना द्यायच्या ठरवून गर्दी पांगली.

दिवसामागून दिवस जात होते. आकाशात मुक्तपणे पतंगाचा वावर वाढला होता. पतंगाच्या शर्यती लावल्या जात होत्या. एकमेकांच्या पतंग काटल्या जात होत्या. वेगवेगळ्या रंग, आकाराचे पतंग पाहिले म्हणजे मन प्रसन्न होत होते.

मला दोन वर्षापूर्वी घडलेला प्रसंग आठवला. आम्ही सर्व मित्र मिळून बागेत बसून पतंग उडविण्याची मज्जा मुक्तपणे अनुभवत होतो. एवढ्यात धापा टाकतच राजू आला. ‘ए पळा रे श्याम्याला शॉक बसला. अरे तो तो.... ’ अन् पुढचा एकही शब्द धाप भरल्यामुळे त्याला बोलता येईना. आम्हालाही काही कळेना. तरीही आम्ही त्याच्यामागून पळतच निघालो.

एका घरावर तारेला पतंग अडकलेला दिसत होता. घराभोवती गर्दीच गर्दी, 'अरे कुठाय श्याम्या?' 'अरे शहाण्या माणसांनो, श्याम्याला दवाखान्यात नेलं. श्याम्याची आई, बाबा, आज्जी सर्वच गेले दवाखान्यात. ' बघता बघता आम्हीही दवाखान्याच्या दिशेने निघालो.

मला आठवतं श्याम राहूल विचारे हा माझ्या वर्गात लहान गटापासून होता. थोडक्यात म्हणजे तो आमच्या सर्वांचा लंगोटीयारच होता. स्वभावाने मनमिळावू चंचल, हुशार. पुढच्या माणसाला क्षणात आपलेसे करून टाकणारा. त्यांच्या आई- बाबांसाठी तो म्हणजे जीव-की-प्राण. एकुलता एक असल्यामुळे तो घरात सर्वांचा लाडका. अभ्यासात तसा तो मध्यमच, परंतू प्रयत्नांती परमेश्वर मानणारा. कोणत्याही गोष्टीत पटकन हार न मानणारा. आपण आपल्या आज्जी, आई, बाबांसाठी खूप महत्वाचे आहोत. म्हणून फाजील महत्व वाढवून न घेणारा. वर्गात पहिल्या काही नंबरामध्ये नसला तरी पहिली श्रेणी घेणारा. त्याचं व्यक्तिमत्व लोभस होतं. गव्हाळ वर्ण, कुरळे केस, मोठे डोळे अन् चेहऱ्यावर नेहमी विनम्रतेचा भाव. नेहमी दुसऱ्याला मदत करणारा. या सर्वामुळे तो सर्व मुलांमध्ये प्रिय होता.

त्याला स्नेहसंमेलनात भाग घ्यायला नेहमीच आवडे. तो दरवेळेस अफलातून असे काहीतरी करत असे. त्याच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वामुळे तो शाळेत आदर्श विद्यार्थी म्हणून प्रसिध्द होता. त्याला इयत्ता चौथीतच आदर्श विद्यार्थी पुरस्कार मिळाला होता. आम्हा सर्वांमध्ये जवळ जवळ सर्वांशीच त्याचे छान सूत जुळायचे. 'श्यामला विचारा अन् मग निर्णय घ्या. ' असं ब्रीदवाक्यच आमच्या टीमचं होतं. खरं तर ती त्याची चीड होती. 'श्याम राहुल विचारे. ' बिचारा विचारे आडनाव म्हणून तो चिडे. ते ही तेवढ्यापुरतेच. पुन्हा मात्र शांत.

आम्ही दवाखान्याजवळ पोहोचलो. डॉक्टरांनी त्याला ऍडमिट करून घेतलं होतं. पण पुढचं काही कळलं नव्हतं. मात्र काकूंनी आम्हाला पाहिलं आणि त्यांना भरून आलं. त्यांना काका धीर देत होते. आम्ही बावरल्यामुळे काय म्हणायचे ते आम्हाला सुचत नव्हते.

आज्जी मात्र बडबडतच होती. श्यामला त्यांनी पतंग उडवायला जाऊ नको म्हणून अडवलं होतं. पण श्याम ऐकेल तर शपथ. त्याला आज पतंग उडवायचा मूड आला होता. कालच त्याने रंगीबेरंगी जोकरच्या चेहऱ्याचा आकार असलेला पतंग आणला होता. आई बाबा बाहेर गेले होते. त्यामुळे अडविणारी फक्त आजीच. आज सुट्टी आहे मग आज तरी खेळतो, या त्याच्या म्हणण्यावर आजीने त्याला नानापरीने समजून सांगण्याचा प्रयत्न केला. रस्त्यावर जाऊ नको, एकटाच खेळू नको, पतंगाकडे आकाशातच बघत बसशील, खालीही लक्ष दे. रस्त्यावर खूप खड्डे आहेत. हातपाय मोडून घेशील, वाहनांकडे लक्ष दे आणि अशा एक नाहीतर अनेक सूचना त्याच्यासाठीच होत्या.

त्या सर्वांना मानेने अन् तोंडाने होकार देत देतच तो पळाला. बघता बघता मैदानात येवून पतंग उडवू लागला. त्याची सर्वांपेक्षा वेगळी पतंग पहायला खूपजण जमले. शेजारी मैदानावर खूपजण पतंग उडवत होते. त्यांची अद्भूत पतंग

झोपडपट्टीतील पोरांनी मिळविण्याचे ठरविले. त्याची पतंग उंचच उंच हवेशी हितगूज करत असताना बरोबर काटली. पतंग कटली रे कटली की, सारेजण पळाले.

गोल गोल गिरक्या घेत पतंग एका इमारतीवरील लाईटच्या तारेवर अडकली. बघता बघता इमारतीजवळ पोरांची गर्दी जमली. ती इमारत म्हणजे श्यामच्या शेजारचे घर. श्याम पतंग काढण्यासाठी माडीवर पळाला. ती मुलं येवून त्यांनी आपली पतंग घेण्यापेक्षा, आपण प्रथम काढू. असा विचार त्याने केला. अन् त्याने मुख्य तारेवरची पतंग हाताला येत नाही मग कशाने तरी ओढली पाहिजे म्हणून जवळच पडलेल्या लोखंडी गजेने ओढण्याचा प्रयत्न केला, अन् येथेच घात झाला.

गजेतून वीजप्रवाह प्रवाहित झाला. तो जोरात उडून खाली आदळला. तो डोक्यावर पडल्याने त्याची शुद्ध हरपली होती. खरंच पतंग किती रूपयांचा पण त्यासाठी अनमोल जीवाचा डाव महागात पडला होता.

एकच गोंधळ उडाला, काय झाले हे सर्वांच्या लक्षात यायला, त्याला दवाखान्यात तातडीने पोहोचवायला वेळ लागला. तरीही औषधोपचारासाठी लगेच सुरूवात झाली.

पण थोड्याच वेळात डॉक्टरांनी काकांना काहीतरी सांगितले. दुसऱ्याच क्षणाला दवाखान्याच्या आवारात एका मातेचा आक्रोश सुरू झाला. आसमंतात पतंगाप्रमाणे त्याचा अनमोल असा जीवही उडाला होता. पतंगाची दोरी आपल्या हातात असते पण आपल्या जीवाची दोरी परमात्म्याने पकडून ठेवलेली असते. त्याच्या विरोधात जावून चालत नाही. श्यामची पतंग कटली ती कटलीच. पण आयुष्याची पतंग कायमची आकाशात उंचच उंच उडाली, कधीही परत न येण्यासाठी.

या साऱ्या आठवणींनी माझे मन बधीर झाले. डोळयातून अश्रू गालावर ओघळले. माझ्या मित्रांचे लक्ष माझ्याकडे गेले आणि त्यांना काय झाले कळेना. 'अरे दोस्ता, एक पतंग कटली तर कटली. आपण छान, अद्‌भुत दुसरी पतंग आणू. नाहीतर आपण तयार करू. अरे बघशील तू सर्वजण पतंगालाच बघत राहतील. '

मी शांतपणे फक्त बघतच राहिलो. माझ्या मनात तऱ्हे-तऱ्हेचे विचार येत होते. पतंग काय कितीही कटतील, काटल्या जातील, नव्या आणू. पण श्यामची जोकरचा आकार असलेली पतंग. जोकर हसवतो सर्वांना पण ह्याने तर रडवले. श्यामला आपल्यापासून दूर नेले. म्हणून मी सर्वांना सांगत असतो, पतंग उडवताना काळजी घ्या. जीव लाखमोलाचा असतो. आपल्यापेक्षा तो लोकांसाठी खूप महत्वाचा असतो. श्यामच्या आज्जी श्यामच्या धसक्याने काही महिन्यातच गेल्या. आई बाबांच्या तर जीवनाची दिशाच हरवली. म्हणूनच कोणतीही कृती विचारपूर्वकच करायला हवी.

# * जबाबदार कोण? *

घडय़ाळाकडे बघतच मी आवरत होते. एक एक मिनिट नव्हे सेकंद माझ्यासाठी महत्त्वाचा होता. खरंच जागी होऊनही पहाटे अंथरूणात लोळत वाया घालविलेली पंधरा मिनिटे, आता मात्र त्यामुळे उशीरच उशीर. दररोज पहाटे सव्वाचारला उठणे, हा नित्यक्रमच झाला. उठल्यापासून घर, अंगण झाडणं. सडा, रांगोळी, अंघोळ, देवपूजा, चहा, नास्ता. शाळेसाठी मुलांना आवरणे आणि बरीच इतर छोटी मोठी काम. आठच्या ठोक्याला सर्वांना नाष्टा देऊन पुन्हा भांडेवालीची वाट बघणं. ती आली तर तिचे मोठे उपकारच. शेवटी साडेआठला घरातून बाहेर पडावंच लागतं. घरापासून तासाच्या अंतरावर नोकरीचं ठिकाण, इथून सिटी बसपर्यंत व सिटी बस पासून पुन्हा ऑफिसपर्यंतचं अंतर. या सर्वांचं गणित मनात सुरू झालं. त्या नादातच गॅस शेगडीवर दूध उतू गेलं. अरेरे हे काम वाढलंच म्हणायचं.

ऑफिसमध्ये वेळेवर जाणे हा माझा नियमच होता खरा; पण धावाधाव खूप होई. कधी कधी वाटे इतरांसारखं आपणही काहीतरी कारण सांगून उशिरा जावे, तेवढाच आराम; पण ते माझ्या तत्वात बसत नव्हतं.

दुसरी गोष्ट म्हणजे गेल्याच महिन्यात मी ऑफिसला निघाले. घरातून लिफ्टने खाली जावे म्हटलं तर; पण लिफ्ट काही लवकर येईना. म्हणून शेवटी चौथ्या मजल्यावरून पायरीवरून खाली आले आणि पटकन फाटकातून बाहेर जावे,

या विचारात असतानाच आमच्या यांच्या मावशीने सरिता, सरिता, रिता म्हणून हाका मारल्या. ओळखीचा आवाज वाटला म्हणून फिरून पाहिलं, तर काय मावशी. अरे बापरे! मावशींनी यायच्या आधी फोन तरी करायचा; पण छे! मावशींना लिफ्ट ने वर नेऊन घराचं दार उघडून सर्व व्यवस्थित समजून सांगण्यात पंधरा ते वीस मिनिटे गेली.

कधी नव्हे तो उशीर, कावळा बसायला अन् फांदी तुटायला गाठ पडली. बॉस त्या दिवशी वेळेवर आले होते. काही कामानिमित्त बाहेर जाण्यासाठी ऑफिस बाहेर येऊन थांबले होते. रिक्षातून उतरताना घाईघाईने पळत मी ऑफिसमध्ये जाण्यासाठी वळले आणि बॉसला ऑफिस बाहेर पाहून घामाघूम झाले; पण म्हणतात ना. 'जसे पेराल तसे उगवते' चांगल्या बिया लावल्या तर फळेही चांगली येतात. बॉसला माझ्या चांगल्या कामाचा व वक्तशीरपणाचा अभ्यास होता. त्यांनी गोड हसत माझं स्वागत केलं.

'शिर्के मॅडम, काय झालं कशामुळे उशीर झाला.' त्यांच्या प्रश्नावर मी घडलेला सर्व प्रसंग कथन केला. त्यांना माझा खरं बोलण्याचा स्वभाव आवडला. पुन्हा असा उशीर होणार नाही, याची काळजी घ्या अशी सूचना देऊन ते त्यांच्या कामाला निघून गेले.

त्या प्रसंगापासून पहाटे थोडी लवकर उठून मी माझी कामे वेळेवर आटोपत असे. सानिका आणि रवींद्रलाही वेळेवर शाळेत पाठवले. सानिका पाचवीत तर रवींद्र तिसरीत. त्यांचा अभ्यास घ्यायचा, तो ही मीच; पण काय करणार. मनात विचारांचा झिम्मा चालला होता. शेवटी सर्व आटोपून मी मुलांना तयार करून रिक्षावाल्या काकांकडे सोपवून यांना टिफीन घेऊन निघाले.

आज जरा रस्त्यावर गर्दी वाटत होती; पण मला घाई गर्दीचे कारण जाणून घ्यायलाही वेळ नव्हता. शेवटी एकदाची मी ऑफिसमध्ये वेळेवर पोहोचले होते. दहा वाजून दहा मिनिटांनी मस्टर क्लोज केले जाई.

सकाळी सकाळीच टेबलवर कामांची यादी, फाइलची रेलचेल होती. अकरा वाजता कॉफी घेतली. त्यानंतर दीड- दोनला जेवण करून पुन्हा काम सुरू झालं. तोंडात बडीशेप चघळंत माझं काम सुरू झालं.

अचानक दाताखाली खडा आला म्हणून मी डस्टबिन जवळ आले. ऑफिसमध्ये पंख्याच्या आवाजाने बाहेरील आवाज ऐकू येत नव्हता. खिडकीतून रस्त्यावरचे दृश्य पाहून माझ्या पायाखालची जमीन हादरल्याचा भास झाला. रस्त्यावरून घोळक्याने माणसे उभी होती. प्रत्येकाच्या हातात काही ना काही शस्त्र दिसत होतं. मला काही सुचेना, काय झालं असेल हे जाणून घ्यावे म्हणून मी माझ्या सहकारी आपटे, नकाते, शिरवळकर अशा दोघी तिघींना खिडकी पाशी बोलावलं. त्याही माझ्याप्रमाणेच अनभिज्ञ होत्या. त्यांनीही सर्व पाहून आश्चर्य व्यक्त केलं.

आमच्या हालचालींमुळे सर्वांच्या लक्षात आलं की, काही तरी वेगळं घडतंय. ऑफिसमधील पुरुष मंडळी ऑफिस बाहेर जाऊन परिस्थितीचा अंदाज घेत होती. गल्लीतील गणेश मंडळांमध्ये झालेल्या भांडणाचा राग मनात धरून, एका टोळीने दुसऱ्या टोळीवर साध्या कारणावरून हल्ला केला. मात्र एका मंडळात काही मुस्लिम बंधू होते आणि या गोष्टीचे गैरसमजात रूपांतर झाले. शहरात हिंदू-मुस्लिम दंगा सुरू झाला. एवढ्यात दुसरीकडून काही मुलं पंधरा- वीसच्या संख्येने शस्त्र घेऊन धावत ओरडतच आली. पहिल्या जमावात व आता आलेल्या मुलांच्या घोळक्यात, जोरदार मारामारी सुरू झाली.

एवढ्यात कोणीतरी पोलिसांना फोन केला असावा. भांडण सुरू असतानाच, पोलिसांची गाडी आवाज करतचं तिथे पोहोचली; परंतु पोलिसांच्या गाडीच्या आवाजाने अर्धी अधिक पळून जाण्यात यशस्वी झाली. उरलेल्या पोरांना पोलिसांनी पकडून नेले.

एवढ्यात शहरात आणखी बऱ्याच ठिकाणी गोंधळ सुरू झाल्याचं स्थानिक टीव्ही चॅनलवर दाखवण्यात येऊ लागलं. आम्ही घाबरून गेलो. व्यापारी व इतर सर्वांनी आपली दुकाने, कार्यालये पटापट बंद केली. आता दुपारचे तीन-सव्वातीन वाजले असतील, ऑफिसचे मुख्य दार बंद करून घेतले होते. शहरात दंगा होऊ नये म्हणून संचारबंदी लागू करण्यात आली होती.

माझ्या डोक्यात आता वेगळंच विचारचक्र सुरू झालं. सानिका व रवींद्र यांची सकाळीच शाळा असते, ती दोघं रिक्षाने साडेचार वाजता घरी पोहोचतात ; परंतु ती ज्या परिसरात शाळेत जातात, तिथं जमावाने शाळा बंद करण्यास भाग पाडले होते. शाळेने संबंधित रिक्षा आणि बस व पालकांना फोन करून कल्पना दिल्या होत्या; कारण शिरवळकर मॅडमची एक मुलगी तिसरीला याच शाळेत होती. त्यांनी ऑफिसच्या फोनवरून घरी फोन केला. ती व्यवस्थित पोहचल्याचे कळाले.

मी घरी फोन करूनही काही उपयोग झाला नाही. फोन कोणीच उचलत नव्हतं, याचा अर्थच हा होता की अजून मुलं पोहोचली नव्हती. ऑफिस वेळेमध्ये मोबाइल लॉकर्समध्ये ठेवले जात होते. मी मॅनेजर साहेबांना सांगून ऑफिसच्या फोनवरून फोन केला. लॉकरमधील माझा फोन चेक केल्यावर रिक्षावाल्या काकांचे तीन चार मिस्कॉल दिसले. अरे, पण मोबाइल उचलत नाही, म्हटल्यावर काकांनी ऑफिसच्या दिलेल्या नंबरवर फोन करायला हवा होता. मी महत्त्वाचे काम असेल

तर या फोनवर फोन करा म्हणून माझ्या जवळच्या लोकांना ऑफिसचा नंबर दिला होता.

शेवटी विचार करत रिक्षावाल्या काकांचा नंबर लावला; परंतु काही उपयोग होईना. मोबाइल नंबर लागेना, मला तर काहीच सुचेना. माझी अवस्था 'ना घरका ना घाटका, मै तो राही पनघटका' अशी झाली होती. सध्या बाहेरही पडू शकत नव्हते. शेवटी मी पतीराजांना फोन करून सर्व परिस्थिती कथन केली.

त्यांची कंपनी शहराबाहेर असल्यामुळे त्यांना यातली काहीच कल्पना नव्हती. मात्र मी सांगितलेला वृत्तांत ऐकून तेही काळजीत पडले. त्यांनी 'मी पाहतो काय करता येत का?' असं म्हणून फोन ठेवला; परंतु माझं काही केल्या ऑफिसमध्ये लक्ष लागेना. रस्त्यावर एकही वाहन नव्हते मग मी घरी कशी जाणार माझ्यापुढे मोठा प्रश्न उभारला.

शेवटी आम्ही ऑफिसमधल्या दहा- बारा जणींनी चार वाजता मॅनेंजर साहेबांकडे जाऊन ऑफिसची गाडी मागितली. साहेबांनी सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला; पण आम्ही पोलिसांना मदत मागण्याचे ठरवले. जवळच्या पोलिस चौकीतील साहेबांनी आम्हाला बंदूकधारी पोलिस सोबत देऊन पाठविले. प्रत्येकीला सोडत, सोडत आम्ही साडेपाच वाजता घरी पोहोचलो.

गाडीत बसल्या बसल्या मी सारखी रिक्षावाल्या काकांना फोन लावीत होते. काकांना काही फोन लागला नाही. शहरात नुकतीच संचारबंदी लागू केली होती. याबाबत यांना कल्पना नव्हती, त्यामुळे यांनी मात्र शहरात येण्याचा प्रयत्न केला, म्हणून पोलिसांनी चौकशीसाठी त्यांना पोलीस स्टेशनला नेले. यांनी शेवटी सर्व परिस्थिती कथन केली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून मग पोलिसांनी यांना

सोडलं; पण घरी पोहोचणे अवघड होतं. शेवटी पोलिस स्टेशनमध्ये घरी जाण्याची अडचण सांगितल्याने, आमच्या घराच्या बाजूला ड्युटीसाठी येणाऱ्या पोलीस गाडीमध्ये बसून हे घरी पोहोचले होते.

माझ्या अपेक्षेप्रमाणे मुलं घरी असायला हवी होती; पण मुले घरी नव्हती. आता पुढे काय? आम्ही रिक्षावाल्याचा मोबाइल व रिक्षानंबर पोलिसांना दिला आणि आमची मुलं सापडत नाहीत याची तक्रार नोंद केली. खरं तर रीतसर फिर्यादीची नोंद आणि बऱ्याच गोष्टी करत बसायला वेळ नव्हता; पण तरीही सर्व नियमानुसार पार पाडत जावं लागलं.

शेवटी आम्ही काहीच सुचेना म्हणून स्थानिक चॅनलवर ठिकठिकाणच्या घटना पाहत होतो. बऱ्याच ठिकाणी बस, रिक्षा, कार्यालयाची तोडफोड झाली होती. पाहता पाहता यांचे लक्षं रिक्षाच्या नंबरवर गेलं आणि यांना तर बोलायलाच येईना. त्यानी फक्त उठून टीव्हीमध्ये रिक्षा व त्याची स्थिती दाखवली. इतका वेळ इतका भयानक वाटलं नव्हतं; पण आता मात्र पाचावर धारण झाली.

आम्ही पुन्हा जिथे रिक्षा पाहिली, त्या भागाचं नाव व रिक्षा नंबर देऊन चौकशी करण्याची विनंती करण्यासाठी पोलिस स्टेशनला फोन केला; पण एकतर फोन लागेना व लागला तर कोणी व्यवस्थित उत्तर देईना. आता शहरातील मारामाऱ्या कमी झाल्या. त्यामुळे दंगलीपासून शहरात लागू केलेली संचारबंदी थोड्या काळासाठी उठविली.

पोलिसांनी एका तासाची म्हणजे अवघी साडेसहा ते साडेसात, एवढा वेळ नागरिकांना आपापल्या ठिकाणी पोहचण्यासाठी दिला खरा; पण सगळंच अवघड होतं. घरी जायचं म्हटलं तरी बसगाड्या सुरू नाहीत, बरे बऱ्याच जणांच्या खासगी

गाड्यांचे नुकसान झाले होते; परंतु त्यातही प्रत्येक जण आपापल्या मुक्कामी धावत होता. मी व यांनी रिक्षा ज्या भागात दिसली होती, तिकडे रिक्षावाल्याला दुप्पट भाडे देऊन चलण्याची विनंती केली.

आमची भिरभिरती नजर आमच्या पिल्लांना शोधत होती. शेवटी आम्ही ठिकाणाला पोहोचलो. त्या परिसरात आम्ही रस्ते, गल्ली, बोळ सर्व ठिकाणी मुलांचे फोटो दाखवून विचारत होतो. शेवटी एका म्हाताऱ्या आजीने आम्हाला मुलांना पाहिल्याचं सांगितलं. मला खूप आनंद झाला. मी त्यांना मुलांपर्यंत घेऊन जाण्याची विनंती केली. त्यांनी एका बागेच्या दिशेने बोट केले. आम्ही धावत तिथे पोहोचलो; पण तिथे कोणीच दिसत नव्हते.

मी आणि यांनी मोठमोठय़ांदा हाका मारीत बागेतून चक्कर मारली. एकाएकी मोठ्यांदा रडण्याचा आवाज आला. एका झाडामागे जाऊन पाहता सानिका व रवींद्र दोघही तिथेच होते. त्यांना मी जवळ घेतलं, तेव्हा दोघंही भीतीने थरथर कापत असल्याचं जाणवत होतं. त्यांनी घडलेल्या सर्व प्रसंगाचे कथन केले.

शाळा सोडून दिल्यावर सर्व मुलांना सोडत रिक्षा आपल्या घराकडे जाणार होती; पण एवढ्यात समोरून काठ्या तलवारी घेतलेल्या जमाव पाहून, काकांनी रिक्षाची दिशा बदलून रिक्षा वेगाने चालवत इकडे रस्त्यावर आणली; परंतु इकडेही गोंधळ सुरू होताच. काकांनी आम्हा दोघांना या गल्लीत जा म्हणून बोट दाखवले व ते रिक्षा एखाद्या सुरक्षित ठिकाणी ठेवून मीही तिकडे येतो म्हणाले. आम्ही थोडे पुढे गेलो. आवाज झाल्याने फिरून पाहता, रिक्षांच्या कडेने जमावाची गर्दी दिसली. काका कुठेच दिसले नाही. आम्ही घाबरून पळत येऊन लपून बसलो. इथे दगड रिक्षांवर मारल्याचा, काचा फुटल्याचा ओरडण्याचा खूप आवाज येत

होता. आम्ही मनातल्या मनात देवाचा धावा करीत होतो. काकांनाही सुरक्षित ठेव, म्हणून प्रार्थना करत होतो.

त्यांचा वृत्तांत ऐकून मन खचून गेलं. दोघं गार्डनमध्ये सुरक्षित बसले होते, हे देवाचेच उपकार; पण काकांचं काय? आम्ही तेथून थेट पोलिस स्टेशनला जाऊन मुलं मिळाल्याचं व काका हरवल्याचं सांगितलं.

एवढ्यात काकांचा चुलत भाऊ आम्हाला पोलिस स्टेशनला भेटला. काकांना बेदम मारण्यात आले होते, काका जखमी झाले होते, उगाचच मारण्यात आलं; म्हणून त्या सर्वांच्या विरोधात तक्रार करण्यात आली होती. काकांना सरकारी दवाखान्यात उपचारासाठी नेण्यात आलं होतं. हे काकांच्या भावाबरोबर दवाखान्यात गेले व मी मुलांना घेऊन लवकर घर गाठलं. कारण एक तासाची सूट दिली होती, त्यातील दहा पंधरा मिनिटं उरली होती. तसे तर हेही दवाखान्यातच अडकणारच होते; पण ह्यांना पाहून काकांना आधार वाटेल; म्हणून दवाखान्यात जाण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

तीन चार दिवसांनी सर्व परिस्थिती निवळली. पुन्हा जनजीवन सुरळीत सुरू झाले. मला मात्र जेवणा जेवणानंतर बडीशोप खाताना दररोज आठवण होते. माझ्या पिलांवर ओढवलेला प्रसंग कोणावरही न येवो, ही प्रार्थना मी दररोज करते.

गोंधळ, भांडण, दंगली होतात कशासाठी? आणि यामध्ये नाहक निष्पाप जीवांचा बळी का जावा?

मुलंही ही गोष्ट विसरण्याचा प्रयत्न करतात; पण विसरू शकत नाहीत. त्यांच्या कोवळ्या मनावर दहशत निर्माण झाली. कुठेही आवाज झाला की, त्यांना

त्या दिवसाची आठवण होते. सानिकाने तर ठरवूनच टाकले, ती परीक्षा देऊन नंबर मिळवून, मोठी अधिकारी होऊन, अन्याय करणाऱ्यांना चांगला धडा शिकवणार. विचार केला तर अनेक वेळा विविध कारणांनी समाजात वाद, भांडण, दंगल उसळते. त्यात निष्पाप जीवांचा बळी जातो. त्यांचा दोष असतो का? मग या सर्वांना जबाबदार कोण? आपल्या मनाचा कमकुवतपणा कारणीभूत ठरतो. आपण एकजुटीने राहिलो तर कोणतेच संकट आपल्या वाटेला येणार नाही हेच खरे.

# फसवणूक

रोहनला कालपासून प्रदीपचा फोन येऊ लागला. प्रदीप काहीतरी घटना घडल्यामुळे अस्वस्थ झाला होता हे त्याच्या आवाजावरून लक्षात येत होते.

एरवी प्रदीपचा फोन झाला की, रोहनला खूप आनंद होत असे. कारण फोनवर दिलखुलास बोलणारा प्रदीप बराचवेळ बोलत असे. तो हसला म्हणजे जणू हवेत एक वेगळाच उत्साह संचारत असे. त्याचं दिसणं एखाद्या दाक्षिणात्य नटाप्रमाणे होतं. रहाण्यात, चालण्यात, बोलण्यात एक शाही अदब होती. कोणतीही व्यक्ती त्याला बोलताना मोकळेपणाने बोले. तो प्रत्येकाला हवाहवासा वाटे. याच गोष्टीचं राजकारण त्याला त्याच्या व्यापारात होत होते. तो एका बड्या सोनाराच्या दुकानात कामाला होता. तो नुसता कामाला होता असे नाही तर तो मालकाचा उजवा हात होता. मोठ्या पार्ट्यांना भेटणे, मोठमोठ्या वाटाघाटी करण्यात तो अग्रेसर होता. धंद्यातील बऱ्याच खाचाखोचा त्याला माहित झाल्या होत्या. म्हणूनच मालक त्याला प्रत्येक गोष्टीत सहभागी करून घेत.

प्रदीप असला म्हणजे मालक त्याच्या विश्वासावर दुकान सोडून परगावी व्यापारानिमित्त जात असे प्रदीपने मालकाचा विश्वास संपादन केला होता त्याने मालकाच्या दुकानातील एकंदरीत सगळयाच परिस्थितीचा व्यवस्थित अभ्यास केला होता. त्याला मालक बऱ्यापैकी पगार देत. तरीही सध्याच्या महागाईच्या काळात वाढत्या जबाबदाऱ्या पहाता त्याला स्वत:चा उद्योग सुरू करावा असे वाटू लागले.

घरामध्ये दोन लहान भाऊ, एक लहान बहिण होती. लहान भावांचा शिक्षणाचा खर्च आणि बहिणीच्या लग्नाचा खर्च. घरात वयस्कर आई वडील. बऱ्याच विचाराअंती भांडवलाची जमवाजमव करून त्याने शुभ मुहूर्तावर सोन्याचे दुकान टाकले. मालकाला थोडावेळ वाईट वाटले. परंतू आपल्या हाताखाली शिकून सराईत होवून प्रदीपने स्वत:चे दुकान टाकले याचा अभिमान वाटत होता. उद्घाटन प्रसंगी मालक आपल्या कुटूंबासमवेत आवर्जून उपस्थित होते.

बघता बघता प्रदीपच्या दुकानाचा चांगलाच जम बसला. मशिनमेड आणि हातानेही तयार केलेले दागिने तो विकत असे. गरजू लोकांसाठी म्हणून त्याने सोनेतारण योजनाही सुरू केली होती.

एके दिवशी प्रदीपच्या वर्गात शिकणारी लीना बाटलीवाला तिच्या नवऱ्याला घेवून दुकानात आली. तिला आलेलं पाहून त्याला आकाश ठेंगण वाटू लागलं. कॉलेज जमान्यात ती त्याची धडकन होती. तिला पाहिल्याशिवाय त्याला करमत नसे. तिचे सौंदर्य, हुशारी यावर तो फिदा होता. पण तशी कबुली द्यायची असं ठरवे ठरवेपर्यंत तर कॉलेज मधील जीवन संपलेही. शेवटी लीनाचे सूरज बाटलीवाला यांच्याशी लग्न झाले. सूरजचाही मोठा व्यवसाय होता. घरात लक्ष्मी पाणी भरत असे. एकंदरीत लीना संसारात सुखी होती. पण म्हणतात ना प्रत्येकाची एक वेळ असते. त्याप्रमाणे सूरजला धंद्यात घाटा झाला. यामुळे धंद्यावर आपोआप परिणाम झाला. यातून बाहेर पडण्यासाठी लीना मदत करू लागली.

त्यांना आता दुसऱ्या धंद्यात गुंतवणूक करायची होती. यासाठी लागणाऱ्या भांडवलासाठी लीनाचे दागिने प्रदीपच्या दुकानात गहाण ठेवायचे, अशी आयडीया लीनाच्या डोक्यात आली होती. तसं सूरज अडचणीत आहेत असं सांगितल्यावर प्रदीपने मदतीचा हात पुढे केला होता. पण तिने तो नाकारला होता. आता मात्र लीनाच्या अडचणीत प्रदीप कोणत्या ना कोणत्या पद्धतीने मदत तर करणारच. दागिने गहाण ठेवून पैसे घ्यायचे, ही कल्पना सूरजला पटली. प्रदीपला

मात्र योग्य वाटत नव्हते, पण मदतीसाठी हा मार्ग लीनाला योग्य वाटतो ना मग ठीक नव्हे उत्तम.

त्याने तिचे दागिने घेतले अन् त्याच्या बदल्यात तिने मागेल तेवढे पैसे द्यायचे ठरवले. तिने आठ लाख रूपये मागितले. मनातल्या मनात तो विचार करू लागला. 'एवढी रक्कम देणं योग्य होईल का?' पण मैत्रिणीपुढं व्यवहार बाजूला ठेवला. नाहीतरी काही न घेताही तो मदत करणारच होता. दागिन्यांची किंमत सहा लाखाच्या आसपास असेल. पण आपण तिच्या उपयोगी पडू, यातच त्याने धन्यता मानली. लीना अन् सूरजने मोठ्या कंपनीत पैसा गुंतवला होता. त्यांना बऱ्यापैकी फायदा होणार होता. लीना आता अधूनमधून प्रदीपकडे फेरफटका मारत असे.

एके दिवशी प्रदीपच्या शेजारच्या शांती ज्वेलर्समधून एक स्त्री दागिने गहाण ठेवून पैसे उचलणार होती. पद्धतीप्रमाणे दागिने तपासल्यावर त्यातील काही दागिने खोटे निघाले. ते सोन्याचं पाणी दिलेले होते. माझ्या सासरच्या लोकांनी घातले. मला तरी काय माहित अशी बतावणी त्या स्त्रीने केली.

खरंतर ती स्त्री शांती ज्वेलर्सच्या दुकानात कामाला असणाऱ्या मुलाची बायको होती. दागिन्याची तपासणी करायचे काम तोच मुलगा करत असे. पण आज योगायोगाने मालकांनी स्वत: तपासले. मग काय, मागच्या अनेक गिऱ्हाईकांचे दागिने तरी याने व्यवस्थित तपासले की याची काही मिलीभगतगिरी होती आणि बरोबर हेच मालकाच्या लक्षात आले. शेवटी व्यापारी दृष्टिकोणातून ते दागिने तपासलेच जाणार होते पण नोकराकरवी हे काम झाले असते तर मालक फसला असता. समज देवून त्याला कामावरून काढून टाकले. पोलिसात तक्रार मात्र दिली नाही.

पण हा हा म्हणता म्हणता ही बातमी सराफ कट्ट्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. प्रदीपलाही हा अनुभव नवाच होता. परंतू विश्वासातल्या जवळच्या

माणसाने असे करणे चुकीचे होते. या गोष्टीमुळे सराफकट्ट्याच्या सर्वच सराफांनी दागिने तपासून घेतले, तसं काही दागिने प्रदीपनेही तपासले. बघता बघता दोन-तीन वर्ष गेली.

या कालावधीत प्रदीपचे राणीशी लग्न झाले. राजा- राणी संसारात चांगलेच रमले होते. प्रदीपला राणी आल्यापासून घरीच काय पण दुकानातही मदत होत होती. राणीने बघता बघता दुकानातील प्रत्येक गोष्ट समजून घेतली. प्रदीपला परगावी व्यापारानिमित्त जाण्यास वेळ मिळू लागला.

एके दिवशी व्यापाराच्या निमित्ताने काही महत्त्वाच्या वाटाघाटीसाठी तो मुंबईला गेला होता. लीना व तिचा नवरा सोनं सोडवून घेण्यासाठी आले होते. लीनाचा आपल्या घराविषयी घरोबा माहितच होता. पण तरीही तिने नवऱ्याला फोन करून दागिने देत असल्याचं सांगितलं. रीतसर सर्व बाबी झाल्या. लीनाने दागिने घेताना तपासून देण्याची मागणी केली. दागिने ठेवून घेताना मात्र प्रदीपने दागिने तपासले नव्हते. राणीला त्यात काही विशेष वाटले नाही, म्हणूनच दागिने तपासले.

दागिने तपासायला सांगितलेला नोकर मालकिणीकडे आश्चर्याने पाहू लागला. राणीने त्याला पटकन आवर बाकीची गिऱ्हाईक खोळंबलय असं तिने सांगितले. पण त्याला स्थिर पाहून ती अवाक् झाली. जणू तो बर्फच झाला होता. त्याने राणीला दागिने खोटे असल्याचं सांगितलं. राणीच्या डोळयापुढे दिवसा तारे चमकल्याचा भास झाला. आपल्याला उंच ठिकाणाहून कोणीतरी दरीत ढकलतंय असा भास झाला. ही गोष्ट प्रदीपला सांगावी की नको अशी तिची द्विधा मनस्थिती झाली. परगावी आहेत, त्यांना हा धक्का सहन होईल का? ते मुंबईला महत्त्वाच्या कामानिमित्त परगावी गेले, त्यांना हा आघात कसा सहन होईल. या सगळया विचारात असतानाच लीनाने तिला हाक मारली, ' 'वहिनी, अहो द्या ना दागिने

प्रेम. मला कार्यक्रमाला जायची घाई नसती ना तर निवांत थांबले असते. ' राणीला तिला काय बोलावे ते सुचेना. गोड बोलून पाठीत खंजीर खुपसण्याची कला तिला छान अवगत होती. तसंतर लग्न झाल्यापासून लीनाला पाहिलं की, तिचं डोकं सटकत असे. पण काय करायचं ? नवऱ्याची मैत्रीण म्हणजे वेगळाच रूबाब होता.

लीनाला दागिने आताच हवे म्हणत तिने तगादा लावला. उचललेली सर्व रक्कम त्यांनी राणीच्या पुढ्यात ठेवली. राणीला कोणीतरी शांत पाण्यात एकदम दगड टाकावा तसं वाटलं. हो नाही करत तिने दागिने समोर ठेवले. लीनाने लाडिक स्वरात दागिने तपासून देण्याची मागणी केली होती. अन् जवळ जवळ ती जोरात किंचाळली. मी ठेवलेले ते हे दागिने नव्हेत. राणीला तिने विचारणा केली. मी खरे दागिने ठेवले होते, खोटे नाही.

खरंतर तिच्यापुढे दागिन्यांची तपासणी न होताच तिने हे दागिने खोटे आहेत हे कसे ओळखले. राणीचा संशय बळावला, पण ती काही बोलू शकली नाही. तिच्या डोक्यात विचारांचं काहूर माजलं. डोक्यात असंख्य मुंग्या येवू लागल्या. शेवटी तिने लीनाकडे दोन दिवसांची मुदत मागितली. प्रदीपही तोपर्यंत गावावरून येणार होता.

परंतू लीनाने आता जमदग्नीचा अवतार धारण केला होता. आपण आता पोलिसात तक्रार दाखल करणार आहोत असे सांगितलं. क्षणात नात्यांचा खेळ तिने मोडला. विश्वासाने न तपासता घेतलेले दागिने परत देताना मात्र तपासल्याशिवाय घेणार नसल्याचे सांगितले. ती आपल्या निश्चयावर ठाम होती.

तक्रार नोंदविल्यामुळे पोलीस आणि बघ्यांची गर्दी वाढली. जो तो प्रदीपने असं करायला नको होतं असंच बोलत होता. कारण दिसणारी परिस्थिती लीनाच्या बाजूने होती. एकतर सुंदर व्यक्तिमत्व, अनेक ठिकाणच्या मोठ्या ओळखी आणि

लाघवी बोलणं. खोटे दागिने आपल्याला परत देवून या सोनाराने आपली फसवणूक केली, या सर्व परिस्थितिचे तिने तांडव मांडले होते. तिचा अवतार पाहून जो तो तिला सहानुभूती देत होता.

राणीने नाविलाजाने प्रदीपला सारी परिस्थिति सांगितली. प्रदीपच्या पायाखालची जमीन सरकली. खरंतर लीना म्हणजे त्याचं मनात लपून राहिलेलं अधूरं प्रेम. पण तिने असा दगा फटका केला, तो स्तब्ध झाला त्याला सर्व घटना स्पष्ट डोळयासमोर येवू लागल्या. दुकानाच्या उद्घाटनादिवशी पुढंपुढं मिरवणारी आपल्या दुकानासाठी आवर्जून भेटवस्तू देणारी, नेहमी जवळीक साधणारी लीना त्याला फसवून गेली. खरंतर शांती ज्वेलर्स मधल्या घटनेनंतर त्याने शहाणं व्हायला हवं होतं. पण बाकी सर्वांचे दागिने तपासले तरी लीनाचे मात्र दागिने त्याने तपासले नव्हते. त्याला स्वत:च्या वागण्याचा मनस्वी राग येत होता. आपल्या हातून असं घडण्याचं कारण आपलं मन अजूनही कुठेतरी लीनाविषयी भावूक होतं.

तो कसाबसा दुसऱ्यादिवशी गावी परतला. त्याला राणीने सर्व हकीकत सांगितली. तक्रार केल्यामुळे त्याला सर्व दागिन्यांची रक्कम किंवा दागिने द्यावे अशी पोलिसांनी ऑर्डर काढली होती. राणीला तर पोलिसांनी चौकीत नेले होते परंतू राणीच्या भावाने तिला जामीन देवून आणले होते. प्रदीपने आपली चूक राणीला सांगितली. राणीने सर्व परिस्थिति पाहून कपाळावर हात मारून घेतला. स्त्रिया आपल्या दिसण्या, वागण्या, रहाण्याची भूरळ पाडून समोरच्याला मोहजाळात फसवून कशी फसवणूक करतात ते सांगितलं.

कोणताच पुरावा प्रदीपच्या बाजूने नसल्यामुळे त्याला नुकसान भरपाई देण्याशिवाय पर्याय नव्हता. प्रदीपला जबरदस्त अनुभव मिळाला होता. फसवणूक करून घेण्यास तो स्वत: ही तितकाच जबाबदार होता. राणीने घेतलेली रक्कम वजा जाता बरीच रक्कम द्यावी लागणार होती. प्रदीपचा मित्र रोहन वकील होता.

त्याच्याकडून काही मदत होते का हे पाहून त्याला भेटून त्याची वेळ घेतली. रोहननेही या गुंत्यातून प्रदीपला बाहेर काढायचे ठरवले. आणि संपूर्ण केसचा अभ्यास करण्यास सुरवात केली. खरं प्रेम हे कधीही फसवणूक करत नाही. उलट त्याग, शांतपणा, समाधान, प्रियकराच्या सुखात आपलं सुख मानणं ह्यालाचं तर प्रेम म्हणतात. पण प्रेमाचं बाजारीकरण करून स्वार्थ साधणे कितपत योग्य याचा रोहन विचार करू लागला.

# आभास

संयुक्ताची नजर रातराणीच्या झाडावर खिळली होती. रात्र झाली की, तिला कसं कळत असेल खरं? मनमुरादपणे सुवास तरलपणे हवेत पसरावा. तिच्या या वासाच्या प्रेमात गेले कित्येक वर्षे ती न्हावून गेली होती. तीन वर्षांपूर्वी लग्नाच्या वाढदिवसाच्या दिवशीच राहुलने दिलेले झाड, तिने बेडरूम जवळ लावले होते. तिचा मोहक सुगंध तिला खूप आवडे. घराजवळच्या बागेत खूप खूप झाडे होती. काही जमिनीवर तर काही कुंडीत. बागकाम करणे हा संयुक्ताच्या आवडीचा छंद. फुलांची आवड तर खूपच केसात दररोज एक ना एक फूल असे. राहुल ही तिची आवड हेतूपूर्वक जपत असे. कधी एखाद्या वेळेस घराजवळच्या बागेत फूल आले नाही तर तो खास विकत घेऊन का होईना, तिला फूल आणून देत असे. राहुल तिची घेत असलेली काळजी आताशा सर्वांच्या लक्षात आली होती. यावरून नातेवाईकच काय; पण मित्र मैत्रिणी व ऑफिसमध्येही चेष्टा मस्करी होई. दोघांच्या संसाराला आता कुठे चार वर्षे झाली होती; पण संसारवेलीवर अनुष्काने जन्म घेतलाच नव्हता. पहिली काही वर्षे फुल पाखरा प्रमाणे इंद्रधनुच्या रंगात न्हालेली होती. एक एक दिवस हा जणू एकमेकांमधील नातं फुलवणारा घट्ट करणारा ठरत होता. संयुक्ताला तिचं करिअर महत्त्वाचं वाटत होतं. तिला संसाराचा आनंद मन भरून उपभोगायचा होता, मात्र राहुलचे तसे नव्हते. संसारात अपत्यप्राप्ती म्हणजेच फलनिष्पत्ती असे तो मानत नव्हता. लग्नानंतरची दोन तीन वर्षे तरी मजेत गेली,

तरी आता मात्र राहुलच्या या उमेदीमुळे संयुक्ता अन् त्याच्यात एक नाराजीचे धुके दाटू लागले. या धुक्यामध्ये ते एकमेकांना शोधत राहत असत.

आज लग्नाचा चौथा वाढदिवस. आज राहुल ऑफिसमधून लवकर येईल आणि मग आपण देवाला, फिरायला, जेवायला जाऊ, असं काहीसं ठरवून ती गेले दोन तीन तास झोपाळ्यावर मंद झोके घेत बसली होती. प्रत्येक झोका घेताना तिच्या मनात विविध भावनांचे भावतरंग उठत होते. गेल्या चार पाच दिवसांत दोघांचे शाब्दिक खटके उडाले होते. दवाखान्याची ट्रिटमेंट सुरू करून एक वर्ष झालं, त्याच त्या तपासण्या अन् तेच ते प्रश्न. या साऱ्यांना संयुक्ता वैतागली होती. सध्या मात्र ती थोडीशी अबोल झाली होती. अपत्यप्राप्ती पूर्णत्वाला जाऊ शकणार नाही का? हा एकच प्रश्न तिच्या मनाला सतावत होता. लग्नाच्या पहिल्या नवखेपणात संसाराचा अर्थ, तिला दोन जीवांचे, मनांचे, विचारांचे मिलन. एकमेकांसाठी आयुष्यात जगणे म्हणजे संसार असंच वाटत होतं आणि असंच मान्य देखील होतं.

रात्रीचे साडेदहा वाजले म्हणून ती घरात गेली, तिने दार लावून घेतले. तिने गेल्या दोन अडीच तासात वीस- बावीस वेळा तरी फोन लावला होता. मात्र प्रत्युत्तर मिळत नव्हतं. राहुल आपला फोन का उचलत नाही? या बाबीवरून तिच्या मनात प्रश्नांचे जाळे निर्माण होऊन विचारांची वावटळ वातावरणात पसरली होती. आज लग्नाचा वाढदिवस कदाचित तो विसरला असेल, की ऑफिसमध्ये काही काम निघाले असेल किंवा तो मित्रांबरोबर पार्टीत अडकला असेल. एक ना दोन असंख्य प्रश्न. तो आल्यावर त्याच्याशी बोलायचेच नाही, असे ठरवून तिने हातातला मोबाइल रागाने गादीवर फेकला, एवढ्यात दारावरची बेल वाजली. तिने घडय़ाळाकडे पहिले, रात्रीचे साडे अकरा. ही काय वेळ आहे यायची,

म्हणून ती रागाने फणकारत दरवाजा उघडायला गेली तर काय राहुल दारात उभा. त्याच्या हातात तिला आवडणाऱ्या गुलाबांचा छानसा बुके. वाढदिवसासाठी त्याने तिच्यासाठी बुके आणला होता खरा; पण त्याच्यावर खूप चिडावं, ओरडावं असं तिला खूप वाटलं; पण नेहमीप्रमाणे मिश्किल भाव चेहऱ्यावर आणत, नजरेनेच नजरेला नजर भिडवून खूप काही न बोलता ही नजरेच्या भाषेने बोलून गेला तो. तरीही आपण या प्रसंगी मोहजालात न पडता त्याला उशिरा येण्याचा जाब विचारायचा, म्हणून तिने हातातला बुके न स्वीकारता तिने स्वयंपाकघराकडे आगेकूच केली. स्वयंपाकघरातून राहुलला ती हाक मारू लागली. त्यावर त्याने आलो दोन मिनिटांत फ्रेश होऊन असं उत्तर दिलं. त्याची ही सवय तिला चांगली माहिती होती. महाशयांना दिवसातून दोनदा आंघोळ करायची सवय होती. त्याला जमेल अन वेळ मिळाला तर अधूनमधून स्विमिंगलाही जात असे.

तिने घाईघाईने काहीतरी खाण्यासाठी करावे म्हणून तिने गॅस पेटवून कढई ठेवली, एवढ्यात टॉवेल म्हणून तो ओरडला. ही त्याची सवय ही ती चांगली जाणून होती. टॉवेल घेण्याच्या निमित्ताने तो तिला कधी शॉवरखाली ओढेल अन् …… ती त्या प्रसंगाला आत्ताच सामोरे जाऊ इच्छित नव्हती, कारण आज तिच्या मनात खूप राग होता राहुलविषयी. एवढीच जर आठवण होती तर मग यायचं ना लवकर घरी. गेलो असतो कुठे तरी आणि बरीच बडबड तिने केली. गॅस बंद केला आणि ती टॉवेल घेऊन बाथरूमकडे वळणार, एवढय़ात दारावरची बेल वाजली. आता आणि कोण? तिने दाराकडे जात सहज घडाळ्यात पाहिले, बारा वाजले होते. दार उघडावं की नको? कोण असेल? अशा विचारांसह तिने आय होलमधून बाहेर पाहिलं, तर काय पोलिस. यावेळी अन् पोलिस तिने दार उघडले. दारात एक पोलिस ऑफिसर आणि दोन शिपाई उभे होते. तिची प्रश्नार्थक नजर पाहून साहेबांनी सुरुवात केली.

‘मी इन्स्पेक्टर बापट. आपण?’

‘मी राहुल यांच्या सौभाग्यवती संयुक्ता. का काय झालं?’

‘सॉरी. मिस्टर राहुल यांचे काही सामान'

असं म्हणत त्यांनी राहुलचा मोबाइल आणि ऑफिसची बॅग, पैशांचे पाकिट संयुक्ताच्या हातात दिली. संयुक्ता डोळे फाडून हे सारं पाहत होती. तिच्या मनात बरीच खळबळ माजली होती. नक्की मिस्टर बापट कशासाठी सॉरी म्हणताहेत हेही तिला समजेना. ती तेव्हड्यातूनही म्हणाली,

‘हे तुम्हाला कुठे सापडलं?’

‘ बॉडी जवळ. ’

‘ कोणाच्या ?’

‘मिस्टर राहुल यांच्या. ’

आता मात्र सारं घर जोरात आपल्या भोवती फिरतंय असा तिला भास झाला. थोड्या वेळापूर्वी घरात आलेला तो, तो राहुल नव्हता, भास तर नसेल ना. तिच्या तोंडातून शब्द फुटेना. पोलिसांना राहुल घरात आहे. वॉश घेतोय हे सांगायलाही तिने तोंड उघडलं पण शब्द काही मुखावाटे बाहेर पडले नाहीत. एवढ्यात पोलिस इन्स्पेक्टर म्हणाले,

अरे गवळी मॅडमला साहेबांच्या गाडीची चावी दे. मॅडम गाडीचं फारसं काही नुकसान झालं नाही गाडीचं. पाहा हवं तर म्हणून बाहेर गाडीकडे त्यांनी हात

केला तेवढ्यात ही संयुक्ताने उसनं अवसान आणलं आणि बाहेर पाहिलं तर काय रस्त्यावर गाडी होती.

आता मात्र तिचा पक्का समज झाला की, तिला राहुल घरात आला असं वाटलं तो तिला भास झाला होता. कारण राहुल घरात आल्याची एकही खून दिसेना. दारात शूज नव्हते. गाडी तर पोलिसांनी आत आणली आणि बुके पाहण्यासाठी तिने हॉलमध्ये नजर फिरवली पण तिला तो कुठेच दिसला नाही. बापरे! भास. म्हणजे पोलीस म्हणतात त्याप्रमाणे बॉडी राहुलची होती. तिने पूर्वी केव्हा तरी ऐकले होते की, एखादी व्यक्ती मृत पावते तेव्हा तिचा आत्मा प्रिय व्यक्तिला पाहून, भेटून जातो. या गोष्टींची अनुभूती तिला काही वेळापूर्वी आलीच होती. ती पोलीस इन्स्पेक्टरला अनुभव सांगावा म्हणून काही बोलणार एवढ्यात तेच म्हणाले,

‘ मॅडम आपले कोणी नातेवाईक असतील तर त्यांना घेऊन ऑफिसला या. सर्व सोपस्कार पूर्ण करून बॉडी ताब्यात देता येईल. तुमच्या नातेवाईकांचे नंबर द्या, जवळचा कोणा एकाचा नंबर सांगा त्यांना आम्ही फोन करू. ’

या सगळया धांदलीत तिच्या हातात टॉवेल का होता, हे तिला आठवले आणि ती जवळजवळ पळत बाथरूम कडे गेली. तर काय तिथे कोणी नव्हतं. ती मोठ्याने किंचाळी,

‘राहुल, राहुल तू मला असं फसवून लग्नाच्या वाढदिवसादिवशी एकटाच निघून गेलास?’

असं म्हणून ती बेशुद्ध झाली. तिच्या या आवाजाने सारे घर दणाणले अन् बेडरूममधून राहुल नाईटीमध्ये बाहेर आला.

‘ संयुक्त, संयुक्ता, संयुक्ता काय झाले ?’

आता मात्र इन्स्पेक्टर बापटांना काही गोंधळ कळेना. बॉडीजवळ जे पाकिट सापडलं, त्यात याच व्यक्तीचा फोटो होता. मग, मग नक्की डेडबॉडी कोणाची होती? राहुलला प्रश्न पडला होता, मला टॉवेल दे म्हटल्यावर ही अचानक कुठे गायब झाली. मी बेडरूममध्ये वाट पाहतोय. स्वयंपाक घरात असेल असं वाटलं. त्या घरात त्या वेळेस असंख्य प्रश्नांचे ढग प्रत्येकाच्या मनात दाटले होते.

संयुक्ताला चेहऱ्यावर पाणी शिंपडून जागं केलं. ती राहुल जवळच होती, जागी होताना ती सारखी राहूल, राहूल म्हणून हाक मारत होती. ती आता जरी त्यांच्याजवळ होती, तरी तिला खरे वाटत नव्हते. चिमटा घ्या पाहू म्हणून तिने राहुलला सांगितले. राहुलने तिला पूर्ण जागे केले तिला खुर्चीवर बसविले. इन्स्पेक्टरने घडलेली सारी हकिकत सांगितल्यावर, राहुल मोठ्याने हसू लागला.

‘मेलेली व्यक्ती मी नसून माझं सारं चोरून पळणारी कुणी दुसरीच व्यक्ती होती. ’

त्याने त्याच्या बरोबर घडलेली सारी हकीकत सांगितली. परदेशी पाहुणे ऑफिसमध्ये आले होते, त्यांना घेऊन तो मंदिरात गेला. मंदिरात बरीच गर्दी होती. त्या गर्दीत लक्ष ठेवून त्याचं पाकिट कोणीतरी मारलं. दर्शन घेऊन आल्यावर पाहतो, तर काय त्याचे अन् पाहुण्यांचे शूज गायब. शोधाशोध केली; पण उपयोग झाला नाही. परदेशी पाहुण्यांपुढे त्याला कसे तरी वाटले. बाहेर येऊन पाहतो तर गाडीही गायब, खिशात हात घातला तर पाकीट अन् चावीही गायब. बापरे! आज दिवस चांगला नाही. असंच त्याला वाटलं. त्याने तिथे जवळच असलेल्या पोलिस

स्टेशनमध्ये कम्प्लेंट केली. परदेशी पाहुण्यांना टॅक्सीने हॉटेलवर नेऊन सोडले. या सर्व धांदलीत त्याला रात्रीचे साडेअकरा वाजले होते घरी यायला. पोलिसांनी त्यांना सापडलेल्या डेड बॉडीचे वर्णन केले. यावर अशीच व्यक्ती मंदिरात आपल्याला धडकून गेल्याचे त्याने सांगितले; पण अपघातात त्या व्यक्तीचा चेहरा खराब झाला होता. बाकी सर्व पोलिस स्टेशनला या पुढची कारवाई पूर्ण करू, असं सांगून पोलीस गेले. संयुक्ताच्या मेंदूत असंख्य मुंग्या डंख मारत होत्या. आज होऊ नये ती घटना घडली असती तर, एवढ्यात राहुल दार लावून आला.

‘संयुक्ता, संयुक्ता काय झालं? चल. ’

‘ अं काय म्हणालात? कुठं जायचं ? आणि मघाशी तुम्ही बुके आणला होता तो कुठे ?’

‘तो ना…….. ’

असं म्हणत त्याने तिला हाताला धरून बेडरूम कडे नेले. त्याने फुलांनी छान सजावट केली होती रुमची. ते पाहून संयुक्त लाजून चूर झाली अन् आम्ही नाही जा म्हणून लाजून त्याच्यापासून दूर पळाली.

# अट्टाहास

सुनंदा सकाळपासून बेचैन होती. तिला काही तरी वेगळे जाणवत होते. सतत चक्कर अन् अधूनमधून कोरड्या उलट्या. यामुळे जीव नकोसा झाला होता. घरात सर्वजण अस्वस्थ होते. सासूबाईंना घेऊन ती दवाखान्यात गेली. त्यांना बराच वेळ लागला. तिथे बरीच गर्दी होती. घरी सारेजण चिंतेत होते. लीना तर सारखी आईला फोन करून वहिनीविषयी विचारत होती; पण जेव्हा दोघीही घरी परतल्या. अन् घरामध्ये आनंदाची लकेर उमटली. सुरेशला आपल्या घरात पाहुणा येणार ही बातमी समजताच त्याने आनंदाने घर डोक्यावर घेतले. लीनाला पार्टीसाठी म्हणून पाचशे रूपये दिले. गोड बातमी आली म्हणून तोंड गोड केलं. त्याचे दोनाचे चार हात होऊन पाच-सहाच महिने झाले होते; परंतु त्या चाराचे सहा केव्हा होतात म्हणून तो बऱ्याच दिवसापासून वाट पहात होता. लोकांच्या चौकशीला घरातला प्रत्येकजण आरी पडला होता. घरातही कुजबूज होतीच; पण शेवटी काय, देवाने मनावर घेतलं तर आमचं घर वंशाच्या दिव्याच्या तेजाने उजळेल असे अनिताबाईंचे म्हणणे होते. सुरेशला आईचे म्हणणे पटत होतेच. दिवा असो वा पणती दोघेही घरासाठी शुभदायक असतात अशा विचारांचे शामराव होते. घरातील सर्वांची प्रतिक्षा संपली.

सुनंदामध्ये होणाऱ्या बदलांमुळे ती अंतर्मुख झाली. आपण आई होणार या भावनेनं पुलकित झाली. हा जीव आपला, आपल्या नवऱ्याचा अंश असणार. खरंच तो कसा दिसेल? कसा असेल? कसा वागेल? या दिवास्वप्नात सुनंदा रममाण व्हायची. फिरायला जाणे, व्यायाम करणे, संस्कारक्षम पुस्तके वाचणे, योग्य व

सकस आहार घेणे, असा दिनक्रम ठरवला. तिने सर्व बाजूंनी आपल्या मनाची व शरीराची तयारी केली. या सर्व गोष्टींमध्ये तिला बघता बघता तीन महिने झाले. प्रत्येकजण काळजी घेत होता. काय हवं, काय नको पाहत होता. ती दोघेही नोकरी करत होती. तिच्या ऑफिसमध्ये तिला पोहोचवणे, आणणे, आठवण आली की फोन करणे या सर्व गोष्टी तो मन लावून करत होता. नेहमी घरात सुकामेवा, फळं, पौष्टिक पदार्थांची रेलचेल असे. आपलं स्वप्न सत्यात उतरणार म्हणून तो भलताच खुश होता.

महिन्याच्या तिसऱ्या रविवारी त्याची मित्र कंपनी ठरवून एकत्र येत असे. त्यांचा सात जणांचा ग्रूप होता. त्याने ही आनंदाची बातमी सांगितली अन् त्यांच्यामध्येही आनंदोत्सव झाला. पार्टी करूनच तो घरी परतला. मात्र दुसऱ्या दिवसापासून सुनंदाला दवाखान्यात चल म्हणून मागे लागला. सुरेशचा भलताच हट्ट चालला होता. त्याला पुत्ररत्न असावं असंच वाटत होतं. त्याच्या मित्र कंपनीमध्ये सर्वांना मुलं होती. त्यालाही मुलगाच हवा असा त्याचा अट्टाहास चालला होता. ती भलतीच काळजीत पडली होती. तिने तपासणी करून घ्यायला नकार दिला होता. सुरेशची आई फक्त त्याच्या बाजूने होती. बाकी सर्वजण सुनंदाच्या मताचेच होते. सुनंदाला आपल्या पाठीशी बहुमत आहे हे कळल्यावर तिने सुरेशला आपले मत हिमतीने सांगितले. सुरेश मात्र ध्रूव बाळासारखा आपल्या निश्चयावर अढळ होता. त्याने घरात मौनव्रत धारण केले. कामापुरतंच बोलायचं, कोणी बोलायचा प्रयत्न केला तर चिडचिड करायची. यामुळे घरात ताण जाणवू लागला. सुरेशचा हा प्रयोग तेवढा काही यशस्वी झाला नाही. म्हणून त्याने नामी योजना आखली. जेवण करताना तो कारण काढून ताटावरून उठून जाई. या सगळ्या ताणतणावात सुरेशची प्रकृती ढासळू लागली. त्याच्या आई वडिलांना काळजी वाटू लागली. या सर्वाचा परिणाम म्हणून सुगंधाने नाईलाजाने गर्भलिंग तपासणी करून घेण्याचे ठरविले. परंतू त्यापुढील निर्णय हा मीच घेणार हेही

ठामपणे सांगितले. तसा सुरेश तयार नव्हता; पण सर्वांपुढे त्याचा नाईलाज झाला. बघू काय होतंय ते, या विचाराने तो तयार झाला.

दिवस ठरवून डॉक्टरांकडे गेला. डॉक्टरांनी सुरेश- सुगंधा या दोघांना बसवून तूम्ही असा निर्णय का घेताय? आणि मुलगाच हवा हा हट्ट नक्की कोणाचा? हेही विचारले. सुगंधाकडून मिळालेल्या माहितीनुसार त्यांच्या एकंदरीत सगळी मैत्रेयी, सुनीता विल्यम्स, कल्पना चावला, प्रतिभा पाटील या सर्व महिलांचा आदर्श समाजाने का व कशासाठी घ्यावा हे तर सांगितले; पण त्या महिलाच होत्या हेही विसरणे चुकीचे आहे, घरात आजी, आई, बहीण, वहिनी, बायको या सर्व स्त्रियाच आहेत. त्या सर्वजणी नसल्या तर जीवन पूर्णत्वाला गेल असतं का? शेवटी या जीवनाचं हे सत्य आहे की एक स्त्री एक पुरुष हे नातं असल्याशिवाय हे जग चालणार नाही. आज प्रत्येकाने मुलाचा अट्टाहास केला तर विश्वाचे संतुलन बिघडेल. प्रत्येक क्षेत्रात खांद्याला खांदा लावून कार्य करतात. हरेक क्षेत्रात प्रावीण्य मिळवितात, कौशल्य मिळवितात. मग आपण त्यांना कमी का लेखतो किंवा गळयातले ओझे का समजतो. राजकारणासह इतर अनेक क्षेत्रात त्या अव्वल दर्जा प्राप्त करतात. मग मुलांचा अट्टाहास का? डॉक्टर एका संस्थेचे चेअरमन होते. त्या संस्थेतर्फे जिव्हाळा नावाचा एक वृद्धाश्रम चालवला जाई. यामध्ये चाळीस वृद्ध होते. डॉक्टरांनी त्यांना जिव्हाळामध्ये आमंत्रित केलं. दर तीन महिन्यांनंतर आपल्या आई बाबांना त्यांची मुलं येऊन भेटत. सुरेश वेळेवर जिव्हाळामध्ये गेला; परंतु त्याच्या लक्षात आले की त्या दिवशी चाळीसपैकी फक्त बोटावर मोजण्याइतकी मुले- मुली आपल्या आई बाबांना भेटायला आली. बाकी सर्वांनी काही ना काही कारण सांगून येण्याचे टाळले होते. आलेल्यांपैकी मुलींचे प्रमाण जास्त होते. मुले एक दोन होती. एका आजोबांनी आपला अनुभव कथन केला. त्यांना चार मुले एक मुलगी. आयुष्यभर चिकाटीने संसार करून मुलांना शिक्षण

दिले. एक मुलगा अमेरिकेत, एक चेन्नई, एक दिल्ली तर एक कॅलिफोर्नियाला. मुलगी कोल्हापूरला दिल्या घरी सुखी होती. या चार मुलांना आईवडिलांना सांभाळणे होत नाही म्हणून चौघांनी मिळून त्यांना वृद्धाश्रमात ठेवले होते; पण वर्ष सहा महिन्यांत देखील भेटायला येत नव्हते. मुलगी आई वडिलांना आपल्या घरी ठेवू इच्छित होती. मात्र आई वडिलांचा स्वाभिमान आडवा येत होता. मुलगी दर तीन महिन्याला येऊन भेटून जात होती. हे सर्व ऐकल्यावर सुरेशला वास्तवाचे भान आले. सुरशचे डोकं सुन्न झालं. आपण करतोय तो अट्टहास किती चुकीचा आहे हे लक्षात आल्यावर तो शांत झाला. दोन चार दिवस तो विचार करतच होता

एके दिवशी मात्र त्याने घरातल्या सर्वांसमोर आपला निर्णय जाहीर केला येणाऱ्या बाळाचेआपण मनापासून स्वागत करणार आहोत. मग तो मुलगा असो वा मुलगी सुरेशच्या निर्णयामुळे वातावरण स्वच्छंदी उत्साहवर्धक वाटू लागले. सुगंधा सुरेश आपल्या भविष्याच्या स्वप्नात सप्तरंगी इंद्रधनूत हरवून गेले.

# एकटी

आकाशात नभ दाटून आले होते. मन भरून आल्यासारखे काळया ढगांनी आकाश भरले होते. भरलेल्या नयनांमधून आसवे केव्हा गालावरून ओघळतील हे जसे सांगता येत नाही त्याप्रमाणे आकाशातले मेघ केव्हा बरसतील काही सांगता येत नव्हतं. असंच वातावरण केतकीला आजिबात आवडत नसे. तिच्या जीवाची घालमेल होऊ लागली. एकटीच असल्यामुळे अशा वातावरणात तिला अंथरुणातून उठून एक कप चहा करून घ्यावा असेही वाटेना. तशी ती बऱ्याच दिवसापासून एकटी राहात होती. या एकाकीपणाचा तिने चांगलाच अनुभव घेतला होता. तिने कॉलेजमध्ये आधिव्याख्याता म्हणून नोकरीला लागून दोन वर्षे झाली होती. पुढे पीएचडी करण्यासाठी बायोकेमीस्ट्री विषय तिने निवडला होता.त्यासाठी सरकारकडून तिला स्कॉलरशिप मिळाली होती . तो अभ्यासक्रम तिला परदेशात राहून पूर्ण करावा लागणार होता . तिच्या या यशाबद्दल सर्वत्र तिचे कौतुक होत होते. अभिनंदनाचा वर्षाव होत होता. आज रजनीश असता तर तो भलताच खुश झाला असता. आज या यशाच्या आनंदातही ती मात्र दुःखी होती. खरे तर तिचा भरला संसार... असला असता. या विचारसरशी तिच्या डोळयासमोर भूतकाळातले दिवस तरळू लागले.

ती एफवाय बीएसी ला असताना रजनीश बीई करीत होता. या आधीचे शिक्षण कोल्हापूरला झाले होते. परंतु त्याच्या बाबांची बदली सोलापूरला झाली आणि तो नव्यानेच शासकीय वसाहतीत राहायला आला. केतकी ए ब्लॉकमध्ये राहायला तर तो एफब्लॉक मध्ये राहत असे. त्याचं आणि केतकीचं कॉलेज एकाच मार्गावर होत. केतकीचा मनमोकळा स्वभाव, तिचे लोभस वागणं, वर्गात टॉप ला राहणं, सोसायटीतल्या प्रत्येक उपक्रमात हिरीरीने भाग घेणं, सर्वांशी मिळून

मिसळून वागणं, नेहमी हसतमुख राहणं हा तिचा स्वभाव आणि सावळंच पण लोभस दिसणं. तिला सर्वजण रूपसुंदरी म्हणून ओळखत. हे सर्व त्याला आवडू लागलं.

केतकीच्या घरात सुगंधा, सरिता अशा दोन बहिणी आणि आई बाबा. केतकीच्या आई बाबांना कधीच मुलगा नसल्याचं दु:ख वाटत नसे. कारण त्यांच्या तिन्ही मुली खूप हुशार होत्या. वर्गात नेहमी प्रथम क्रमांक. मग काय,प्रत्येकीचे गुण रूप वर्णन करावे असेच होते. रजनीशच्या घरात आई-वडील आणि रिना नावाची एक बहिण. तीही केतकीबरोबर कॉलेज मध्ये शिकत होती.

केतकी जरी विज्ञान शाखेत शिकत होती तरीही ती रसिक होती. विणणे, स्वयंपाक करणे याबरोबरच अवांतर वाचनाचीही तिला खूप आवड होती. रजनीशला तिची ही पुस्तक वाचनाची आवड लक्षात आली. पुस्तक देण्या-घेण्याच्या निमित्ताने तो तिला बोलण्याचा प्रयत्न करीत असे. केतकीने तर प्रथम टाळाटाळ केली. पण रजनीश चांगला मुलगा असल्याचं तिला कळाले. तो आपल्याशी चांगल्याच हेतूने मैत्री वाढवतोय. मग असं वागून त्याचं मन दुखावण्यापेक्षा तिने त्याच्या मैत्रीचा स्विकार केला. अवांतर वाचनासाठी पुस्तक, मासिकं याबरोबरच अभ्यासातल्या डिफीकल्टीही रजनीश छान समजून सांगे.

हळूहळू बसमधून जाता-येता बरोबरच जाणं-येणं सुरू झालं. कळत-नकळत दोघांनाही एकमेकांची साथ हवीहवीशी वाटू लागली. रजनीशचे बीईचे थर्डईअर संपले. अन् कंपनीकडून त्याला जॉब ऑफर आली. रजनीशने केतकीमध्ये आपले गुंतून जाणे मान्य केले होते आणि हे तिच्यापुढे मांडून लग्नासाठी मागणीही घातली होती.

आपणही कुठेतरी रजनीशमध्ये गुंतून गेलो, हे तिला ठाऊक होते. पण ती मान्य करत नव्हती. तिच्या बाबांचा स्वभाव कडक होता. अन् केतकीचे वडिल ज्या खात्यात अधिकारी या हुद्द्यावर कार्यरत होते त्याच खात्यात रजनीशचे वडील शिपाई होते. केतकीच्या बाबांच्या बोलण्यात ते अधिकारी असल्याचा अहम् पणा डोकावत असे. रजनीशच्या बाबांचीही वीस एकर बागायत शेती होती. पण हुद्दा आडवा येणार हे केतकीला माहित होते.एका शिपायाच्या मुलाला मुलगी द्यायची, बाबा मान्य करणार नाहीत. भले तो मुलगा, त्याच्या घरातील लोक, परिस्थिति चांगली असली तरीही. एवढं सगळं असलं तरी आपल्या आपण लग्न ठरवणे केतकीला पटेना. घरात छोट्या दोन बहिणी होत्या. बरेच विचार तिच्या डोळयासमोरून तरळून गेले. म्हणूनच तिने आपण निखळ मैत्री करू असं सुचवले.

नोकरीसाठी म्हणून रजनीश पुण्याला निघाला. त्याला अजूनही वाटत होतं की, कोणत्याही क्षणी केतकी आपलं प्रेम व्यक्त करेल पण सारं व्यर्थ. केतकीच्या घरच्यांचे अन् रजनीशच्या घरच्यांचे चांगले पटत असे. त्यामुळे केतकीची आई शुभेच्छा देवून आली. रजनीश जड अंत:करणाने पुण्याला निघून गेला. केतकीला रजनीश गेल्यापासून उदास वाटू लागले. कॉलेज, घर, मैत्रिणी कुठेच मन लागेना.मनाची हुरहुर कोणाला सांगता येत नव्हती.रजनीशला फोन करावा म्हणून तिने खूप वेळा मोबाइल हातात घेतला अन् नाविलाजाने ठेवला. एकवेळेस तर नंबर डायल केला पण तिने लगेच कॉल कटही केला.

इकडे रजनीशला पुण्याला आल्यावर दिवसभराच्या धावपळीत जाणवत नसे. पण निवांत क्षणी आठवण आल्याशिवाय रहात नव्हती.रजनीशने तिचा मिसकॉल पाहिला अन् त्याचा आनंद गगनात मावेना. आपल्या प्रेमाचा होकार सांगण्यासाठीच तिने फोन लावला असणार, मग तिने फोन कट का केला ? तिच्या समोर घरातले कोणीतरी आले असणार. नाहीतर मग आणखी काही कारण असू

शकतं. तिच्या विचारांनी रजनीशच्या मनात झिम्मा सुरू झाला. रजनीशने धाडसाने तिला फोन लावला. मात्र केतकी फोन विसरून काही कामासाठी बाहेर गेल्याचं सुगंधाने सांगितलं. 'काही निरोप द्यायचा का?' असं पण तिने विचारलं. पण तसं काही नाही सहजचं, म्हणून रजनीशने घरातील सर्वांची खुशाली विचारून फोन ठेवला.

रजनीशला वाटले आपण फोन केल्याचं कळल्यावर केतकी नक्की फोन करेल. या वाट पहाण्यातच दोन-तीन दिवस गेले.पण काही उपयोग झाला नाही. इकडे सुगंधा फोन आल्याचं विसरल्यामुळे तिने केतकीला फोन आल्याचं सांगितलं नव्हतं.

केतकीचं आता शेवटचं वर्ष संपल होतं. या सुटीत ती आत्याकडे पुण्याला जाणार होती. त्यावेळेस आपण रजनीशला भेटूच, अस तिने ठरवलं. परिक्षा एक-दोन महिन्यात संपलीही, ती मोठ्या उत्साहात पुण्याला जायला निघाली. परंतु रजनीश कंपनीतर्फे ट्रेनिंगसाठी सहा महिन्यांसाठी अमेरिकेला जाणार असल्याचं कळाले. रजनीशची मावशी पुण्यात रहातं होती. तिने रजनीशला, रिना व आई बाबांना चार दिवसां साठी आमंत्रण दिले होते.

रजनीशला दगदग नको म्हणून त्यांच्या घरातले सर्व पुण्याला गेले. रजनीश अमेरिकेला जाणार त्याच्या आदल्या दिवशी केतकीने फोन केला. रजनीशने फोन घेतला, मात्र तिला काय बोलावे ते सुचेना. रजनीशचे अभिनंदन करून इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टी चौकशा झाल्या.पण मूळ मुद्दा बाजूलाच राहिला. शेवटी रजनीशनेच मी फोन केल्यावर तू का फोन केला नाहीस असे विचारले. या प्रश्नावर केतकी गोंधळात पडली. मला काहीच माहित नाही असे तिने स्पष्टीकरण दिले. मग रजनीशने सर्व सांगितल्यावर सुगंधा सागायचं विसरली असेल असं ती म्हणाली.कोणाची तरी चाहूल लागल्यामुळे तिने फोन ठेवू का असं विचारल्यावर

रजनीशला राग आला. ‘एवढ्यासाठीच फोन केला होतास?’ असं रजनीश थोडं रागातचं बोलला. तिला सगळं समजतच होतं. तिने धाडसाने बोलायचं ठरवलं पण एवढ्यात बाबा समोर दिसल्याने ‘बाबा तूम्ही' असं म्हणत फोन कट केला.

रजनीशला परदेशी जाऊन सहा महिने होत आले होते. त्याला मायदेशी परतण्याची खूप ओढ लागली होती. या सहा महिन्यात एकदाही केतकीचा फोन का आला नसेल याचा तो विचार करत असे. त्याला केतकीला भेटून व्यक्त होण्याची ओढ लागली होती. रजनीशच्या वडिलांची नौकरी संपत आली होती. त्यांनी जागा घेवून बांधकाम सुरू केले होते. ते आता पूर्ण होत आले होते. वास्तूशांतीसाठी म्हणून रजनीश परदेशाहून पुण्याला आल्यावर पंधरा दिवस रजा घेवून येणार होता.केतकीला मात्र रजनीश नवीन घरी रहायला जाणार म्हणून वाईट वाटत होते. त्याच्या घरच्यांनकडून मिळणारी एखादं दुसरी बातमी ही त्यांना कळणार नव्हती.

रजनीश अमेरिकेहून परतला. त्याने प्रत्येकासाठी काही ना काही भेटवस्तू आणल्या होत्या. केतकीच्या घरच्यांसाठीही भेटवस्तू आणल्या होत्या. केतकीसाठी स्पेशल गिफ्ट घेतलं होतं. सोलापूरला येवून चार दिवस झाले पण तरीही केतकी दिसेना म्हणून रजनीश बेचैन झाला. रीनाकडे चौकशी केली तर तिला निमोनिया झाल्यामुळे ती दवाखान्यात असल्याचं कळाले. हे ऐकल्यावर दादाच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून रीना काय समजायचे ते समजली. पण तरीही अनभिज्ञच राहिली.

रजनीश भेटवस्तू घेवून दवाखान्यात भेटायला गेला. केतकीसोबत सुगंधा, सरिता होत्याच. रजनीशला आलेलं पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. केतकी मनातून खूप आनंदी झाली. केतकीने उठून बसण्याचा प्रयत्न केला पण रजनीशने राहू दे असे सांगितले तरीही सुगंधाला खुणावून ती कशीबशी उठून बसली.आजारी असल्याने तिचे डोळे खोल गेले होते. हातात सलाईन होतेच, हे सर्व असतानाही

केतकीला रजनीश आल्यापासून आपण पूर्ण बरे झालो असे वाटत होते.रजनीशने बोलायला सुरूवात केली.

'बरी आहेस ना ? अगं वास्तूशांती...'

तो काही बोलणार एवढ्यात नर्सने येवून गोळया दिल्या आणि सलाईन आणण्यासाठी रिसीट दिली. रजनीश उठलाच पण सुगंधा आणि सरिताने आम्ही दोघी जातो, तुम्ही बसा असं म्हणून त्या पटकन गेल्या. तसं तर सुगंधा आणि सरिताच्या हळू-हळू सारं लक्षात आलं होतं. रजनीशने केतकीला केलेला फोन सुगंधाला माहित होताच. पुण्यातून रजनीशने केलेल्या फोनमुळेच संशयामुळे बाबांनी तिचा फोन काढून घेतला होता. पण तरीही त्यांच्यातली ओढ वाढतच गेली होती. रजनीशने सुरूवात केली,

'मी काय म्हणत होतो...'

केतकीने वाक्य पूर्ण केले,'आपल्या घराची वास्तुशांती १५ तारखेला आहे.'

या वाक्यासरशी रजनीशचे डोळे आनंद, समाधान, प्रेम या एकत्रित भावनेने चमकले. त्याने अलगदच तिच्या हातावर हात ठेवला. तिचा हात थंड पडला होता. अचानक झालेल्या स्पर्शाने ती लाजली. यासाठी मला तू खूप वाट पहायला लावलीस. रजनीशचे वाक्य अर्धेच झाले असेल अन् सुगंधा आणि सरिता आत आल्या. केतकीने त्यांना पाहिलं पण रजनीशचे लक्ष नव्हते. रजनीशला सुगंधाने उत्तर दिले,

'सब्र का फल मीठा होता हैं।'

या वाक्यासरशी रजनीश केतकी दोघंही अवघडले. हे म्हणजे असं झालं, चोरीचा मामला अन्.... सरिता केतकीकडे पहात म्हणाली,'काय ताई, बार केव्हा उडवायचा मग?'

या वाक्यासरशी सगळेच हसले. तूम्ही दोघं बोलत बसा आम्ही दोघी घरी जावून डबा घेवून येतो. म्हणून त्या दोघी घरी गेल्या. रजनीशने केतकीला आपण कॉलेजपासून तिच्यासाठी वाट पाहिलेले क्षण, मजेदार किस्से सांगितले. आपण प्रेमाची कबुली दिली तरीही तिने होकार देण्यास लावलेला वेळ आणि बऱ्याच गोष्टी. रजनीशने तिला गिफ्ट दिले. या सर्व गप्पांमध्ये दोन तास क्षणाप्रमाणे गेले. डबा घेवून त्या दोघी आल्याच. सुगंधाने चेष्टा करायला सुरूवात केली.

'झालं की नाही बोलणं, नाहीतर आम्ही आणखी एकदा घरी जावून डबा घेवून येतो. यावर चौघेही हसले. रजनीशला घरी जायला हवं होतं. वास्तूशांतीसाठीची बरीच तयारी करायची होती. ' येतो' असं सांगून तो गेला. तो गेल्यावर सरिता ताईला पहातचं म्हणाली, 'हूं, बाकी निवड अगदी एक नंबर आहे.'

यावर केतकी लाजली. पण तिलाच काय घरातील सर्वांनाच बाबांचा स्वभाव माहित होता. दोन दिवसातच केतकी दवाखान्यातून घरी आली. चार दिवसांनी सुगंधाने सहज बसल्यावर विषय काढला रजनीशचा. आईला तिने सर्व सांगितले. प्रथम केतकीवर आई नाराज झाली. पण सुगंधाने सर्व व्यवस्थित सांगितले, मुलगा आपल्याच जातीचा आहे. महिन्याला पन्नास हजार घेतो, दिसायलाही स्मार्ट आहे. या सर्व गोष्टींचा खुलासा केल्यामुळे ती शांत बसली. पण मनातल्या मनात विचार करू लागली. सुगंधा, केतकी अन् सरिता तिघींनीही बाबांना बोलताना सहजचं रजनीशचा विषय काढ म्हणून तगादा लावला. त्यामुळे संधी मिळाल्यावर त्यांनी विषय काढलाही.

‘रजनीश पुण्याहून वास्तूशांतीसाठी आला आहे. मुलगा चांगला आहे, घरातील माणसेही चांगले आहेत. केतकीसाठी स्थळ चांगलं आहे.’

या वाक्यासरशी बाबा आईवर जवळजवळ ओरडलेच.

‘त्या शिपायाच्या मुलाला मी माझी मुलगी देणार नाही.’

एक अक्षरही पुढे न बोलता ते रागाने बाहेर निघून गेले. केतकी, सरिता, सुगंधा बाजूच्या खोलीतून ऐकत होत्याच. केतकी खूप नाराज झाली, तिला उंच टेकडीवरून कोणीतरी ढकल्यासारखं वाटले.

रजनीशच्या घराची वास्तुशांती चार दिवसावर आली होती. रजनीशच्या आई-बाबांनी येवून खास आग्रहाने आमंत्रण केतकीच्या आई बाबांना दिले. रजनीशच्या बाबांना केतकीचे बाबा व्यवस्थित बोलले. सर्व पाहुणचार केतकीच्या आईला म्हणजेच बबिताला करायला लावला. बबिता तर थक्कच झाली. पोटात एक अन् ओठात एक हे बाई यांनाच जमतं. रजनीशचे बाबा गेल्यावर सहजचं बबिताने, आपण सर्वजण वास्तूशांतीला जावू हा पर्याय मांडला. पण तिला अपेक्षित नसलेलं उत्तर मिळालं.

‘ सर्वांनी जायची काही गरज नाही. मला महत्वाच काम आहे, तुझ्या तू एकटी जावून ये.’

चार दिवसांनी बबिता एकटीच वास्तूशांतीसाठी गेली. तिला एकटीला पाहून सर्वांनाच वाईट वाटले. रजनीशला तर खूपच वाईट वाटले, पण बबिताने केतकी न येण्याच कारण सांगितलं. ते त्यांना पटलं, डॉक्टरांनी दगदग करू नका

असे सांगितलं आहे. तसेच तेलकट,आंबट पदार्थ खावू नका असे सांगितलं आहे. तिच्या सोबतीला म्हणून सुगंधा, सरिता दोघीही राहिल्या होत्या.

वास्तूशांती होऊन रजनीशच्या घरच्यांनी सामान हलवले होते. रजनीशची रजा फक्त तीन दिवस शिल्लक राहिली होती. वास्तूशांतीच्या दुसऱ्या दिवशी त्याच्या मित्राचे लग्न होते. त्या लग्नात केतकी,सुगंधाला पाहून त्याला आनंद झाला पण दुसऱ्याच क्षणी तो मावळला. काल काकूंनी प्रकृतीचे कारण सांगितले आणि आज हे काय? तो या भावनेनेच त्यांना पहात होता.

तेवढ्यात काका-काकू ही दिसले. काकांनी त्याला पहाताच हसून नमस्कार करत जवळ बोलावून एका मुलाशी त्याची ओळख करून दिली. रजनीशला काही कळेना. तेवढ्यात काकांनी खुलासा केला, ‘मुंबईच्या मित्राच्या नात्यातले स्थळ केतकीसाठी आलेलं आहे. मुलगा पोस्टात आहे, त्याला केतकी आवडली. केतकी काही आमच्या शब्दाबाहेर नाही.’ हे सर्व ऐकल्यावर रजनीशचा चेहरा एकदम उदास झाला. तरीही रजनीशने हिमतीनं मुलगा कोणत्या पोस्ट ऑफिसमध्ये नोकरीस आहे, असं विचारलं. इतरही बरीच चौकशी केली. तसं तर रजनीशला मुलगा मवाली वाटत होता. तो नोकरीला आहे असं वाटतंच नव्हतं. पण तो केतकी बरोबर लग्न करणार म्हटल्यामुळे त्याच्याविषयी एक प्रकारचा द्वेष वाटू लागला.

काकांनी कारण काढून मुलाला अन् घरच्यांना लांब पाठवून रजनीशला फटकारले. ‘माझ्या मुलीला मी चांगले स्थळ बघून लग्न करून देईन. तिचा विचारही तू डोक्यात आणू नकोस.’ या वाक्यासरशी केतकी,सुगंधा अन् रजनीश दु:खी झाले. शेवटी रजनीशने हसत हसत विषय टाळला. तेवढ्यात काकू आल्या, रजनीशने मुंबईच्या पोस्टातल्या चुलत काकांना फोन लावला. योगायोगाने ते ज्या शाखेत

होते, तिथलाच पत्ता मुलाने सांगितला होता. चुलत काकांनी मात्र या नावाचे कोणी ऑफिसमध्ये नाही म्हणून सांगितलं तेव्हा रजनीशने ही गोष्ट जाहीर केली.

मुलाने मात्र आढेवेढे घ्यायला सुरूवात केली. मी हंगामी तत्वावर कामाला आहे. दुसऱ्या शाखेत आहे, कायम झाल्यावर या शाखेत येणार आणि बरेच काही. त्याची फसवेगिरी सगळयांच्याच लक्षात आली. काका त्याच्याकडे पहातच होते, पण तो काहीतरी निमित्त करून निसटला. काकांनी मुंबईच्या मित्राला फोन केल्यावर त्यांनी सहज उत्तर दिले. मलाही पक्कं काहीच माहित नव्हतं. असं ऐकल्यावर मात्र काका जाम वैतागले. त्यांनी रागाने फोन कट केला. रजनीशच्या चेहऱ्यावरचे विजेत्याचे भाव काकांना सहन होईना. एवढं सगळं होवूनही मी माझ्या मुलीसाठी छप्पन स्थळं पाहू शकतो. असं त्यांनी त्याला ठणकावून सांगितले.

दोन दिवसांनी रजनीश पुण्याला निघून गेला. केतकी बाबांच्या शब्दाबाहेर जाणार नव्हती. सुगंधा, सरिता तिला ताई तू योग्य निर्णय घे म्हणून सांगत होत्या. शेवटी रजनीशचं प्रेम आहे ना तुझ्यावर, हे ही सांगत होत्या. कारण प्रेम जरी असलं तरी त्याने कोणत्याही प्रकारचा चुकीचा निर्णय आतापर्यंत घेतला नाही.

केतकी सगळया गोष्टींचा खूप सखोल विचार करत होती. सर्व शक्यता पडताळून पहात होती. एके दिवशी रजनीशने फोन केला तेव्हा ती फक्त रडत होती, तिला बोलायचे जमेच ना. त्याने मात्र तिची समजूत घातली. तुझ्या बाबांचा होकार घेवूनच आपण लग्न करू असंही सांगितलं. पण केतकी बाबांना चांगलंच ओळखत होती. बाबा त्याची नौकरी, गुण हे लक्षात न घेता फक्त तो शिपायाचा मुलगा आहे जावई म्हणून त्याला मान्य करणार नाहीत. बाबांनी केतकीसाठी खूप स्थळं पाहिली पण तिला साजेसं स्थळंच मिळेना.

बऱ्याच प्रयत्नानंतर संदीप वाटवे नावाचा युवक त्यांना केतकी साठी योग्य वाटला. संदीप उंचापुरा, दिसायलाही स्मार्ट अन् सरकारी नोकरीत होता. झालं! आता बोलणी सुरू झाली. स्थळात खोट काढावी असं नव्हतंच काही. संदीप अबोल होता एवढंच. अबोल नव्हे तर घुमाच होता. बाबांनी केतकीला पसंती विचारायचे कारणच नव्हते. साखरपुडा अन् काही महिन्यात लग्न हा मानस त्यांनी पाहुण्यांना बोलून दाखविला.

संदीप एका पायावर तयार होता. केतकी, सुगंधा मात्र त्याला भेटून सर्व काही सांगणार होत्या. त्यांना कोणाचे आयुष्य उधवस्त करायचे नव्हते. संदीपच्या घरच्यांना मात्र मुलाने मुलीला लग्नापूर्वी भेटणे मान्य नव्हतं. मग काय, बोलाचाली नंतर साखरपुड्याची तारीख काढण्यात आली. केतकी, सुगंधा, सरिता मात्र दु:खी होत्या. तरीही सुगंधाने संदीपच्या बहिणीला गोड बोलून केतकी अन् संदीपच्या भेटीचा दिवस ठरविला. साखरपुड्यानंतर बघू असं संदीपच्या बहिणीचे मत आले.

काही दिवसात साखरपुडा झाला. खरं तर संदीप नको होय करत कसातरी तयार झाला. सुगंधा अन् त्याची बहिण या दोघींच्या साक्षीने भेट होणार होती. तसं पहाता एकांतासाठी आसुसलेली जोडपी वेगळी अन् ही दोघं वेगळी. केतकीला काहीही करून हे लग्न टाळायचे होते, संदीपची अडचण कुणाच्याही ध्यानात येत नव्हती. सुगंधाला संदीपविषयी एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे तो नेहमी गळ्याभोवती स्कार्फ किंवा ओढणी घेतो. साखरपुडा अन् टिळा एकत्रित झाला. टिळ्याला केतकीच्या घरच्यांनी वेगळाच ड्रेस शिवला. प्रथम संदीप घालायला तयार होईना, त्याने सांगितल्याप्रमाणे ड्रेस नव्हता पण नाईलाज झाला. तो त्या ड्रेसमध्ये वेगळाच वाटत होता.

कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. दोघंही समोरासमोर खुर्चीवर बसले. संदीप काहीच बोलत नव्हता. शेवटी सुगंधाने दारातून लवकर बोला रे म्हणून

सांगितले. संदीपच्या बहिणीने उगाचच हसण्याचा प्रयत्न केला असे सुगंधाला वाटले. तिच्या मनातली चलबिचल चेहऱ्यावर जाणवत होती.

संदीप बोलेना म्हणून शेवटी केतकीने सुरूवात केली. मला खूप दिवसापासून तुम्हाला भेटायचं होतं. यावर तो कशासाठी किंवा आणखी काही तरी बोलेल असे तिला वाटले. तो नुसता हुं म्हणून गप्प बसला. मग तिने इकडचा तिकडचा विषय काढून बोलायला सुरूवात केली. तो फक्त मानेनेच हो किंवा नाही किंवा हूं एवढ्याच कृती करण चाललं होत. सुगंधाला आता रहावेना, भावोजी तुम्ही काही तरी बोला ना, असं म्हणत ती त्याच्या जवळ जावून उभी राहिली. संदीपच्या गळयावर टाके घेतलेल्या खुणा दिसत होत्या. ते पाहून काही तरी वेगळच आहे,हे तिच्या लक्षात आले. तिने खुणेनेच केतकीला गळयाकडे पहायला सांगितले. एवढ्यात संदीपची बहिण आत आली. 'चला आम्हाला उशिर झाला.बाकी गप्पा लग्नानंतर.' असे म्हणत तिने संदीपला जवळ जवळ ओढलेचं. एवढ्यात केतकी संदीपला म्हणाली, 'तिलाच काय पण मलाही तुमच्याशी खूप बोलायचं होत हो भावोजी.' यावर एवढा वेळ गप्प बसलेला संदीप पटकन बोलून गेला

'मी काय बोयणार? तुम्हीच काय ते बोया.'

या वाक्यासरशी केतकी सुगंधाचाचं काय पण संदीप व त्याच्या बहिणीचाही चेहरा पांढराफटक पडला. यापुढं मात्र हा हा म्हणता म्हणता सर्वांना ही गोष्ट जाहीररित्या माहित झाली. अन् एकच गोंधळ उडाला. केतकीच्या बाबांनी मला ही सोयरीक मान्य नाही असे सांगितलं.संदीपच्या बाबांनी केतकीच्या बाबांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला पण काही उपयोग झाला नाही.संदीपचा सहा महिन्यापूर्वी अपघात झाल्यामुळे त्याच्या जिभेवर परिणाम झाला होता.स्वरयंत्राला जखम झाली होती पण बोबडेपणा कायम राहिला होता. पण हे

सर्व जरी केतकीच्या बाबांनी ऐकलं तरी ते तडजोड करणार नव्हते. कारण त्यांना रजनीशच्या तोडीचा जावई हवा होता.सर्व जिकडे तिकडे झाले. प्रत्येकाच्या मनावर मानसिक ताण जाणवत होता. त्याच रात्री रजनीशला झालेला सर्व प्रकार केतकीने फोन करून सांगितला. सध्या तू शांत रहा, मी पहातो काय करायचे ते. असं सांगून त्याने पुढील निर्णय घ्यायचे ठरवले. तसं तर संदीपला भेटून आपल्या दोघांविषयी सांग ,असं त्यानंच सुचविलं होतं.

रजनीशने रिनाला फोन करून थोडीफार कल्पना केतकी आणि त्याच्याबद्दल दिली होती. रिनाला केतकी पसंत होतीच. कारण नापसंत करण्यासारखं तिच्यामध्ये काही नव्हतंच. तिनेही वेळप्रसंगानुसार विषय आई-वडीलांच्या कानावर घातला. तसं तर मुलाने आपलं लग्न आपण ठरवणे ही गोष्ट त्यांनाही पटणारी नव्हतीच परंतू केतकीला पाहून शेवटी ते गप्प बसले. रिनाने फोनवरून रजनीशला तसे सांगितलेही. रीतसर मागणी घालायचे ठरले. इकडे केतकीच्या वडीलांचा चांगलाच अपमान झाला पण तरीही रजनीशपुढे हार त्यांना मान्य नव्हती. जेव्हा रिना आई-वडीलांना घेवून केतकीच्या घरी गेली तेव्हा कल्पना देवूनही केतकीचे बाबा बाहेर निघून गेले. त्यांना हार मान्य नव्हती,

‘जसं तुम्हाला पाहिजे तसं करा'

फक्त केतकीच्या आईला सांगून त्यांनी त्या प्रकरणातून काढता पाय घेतला होता. ते घरात नसल्यामुळे रजनीशच्या आई-वडीलांना त्यांची नाराजी लक्षात आली. तरीही केतकीच्या आईने लेकीच्या सुखासाठी त्यांच्या पुढे नमते घेवून बोलल्याने जमवून घेणे भाग पडले. सर्व पाहुणचार होऊन ते घरी गेले. त्यांनी चार दिवसात रजनीशला फोन केला. रजनीशने चार दिवसांची रजा घेवून रजनीश आला. केतकीच्या घरातील सर्वजण व रजनीशच्या घरातील सर्व या सर्वांची परवानगी घेवून केतकीबरोबरच जावून त्याने लग्न करण्यासाठी नोंद केली. एक

महिन्याने कोर्टात लग्न करायचे नंतर जसं जमेल तसं या निर्णयासह तो पुण्याला परतला.

एवढं सगळ होत होतं तरी केतकीच्या बाबांना अजूनही केतकी अन् रजनीशच्या लग्नाची कल्पना पटेनाशी झाली होती. त्यांनी या सर्वापासून लांबच रहायचे ठरवले होते. केतकीच्या मनात मात्र धाकधुक होतीच. बाबांच्या जिद्दी स्वभावापुढे कुणाचंच काही चालणार नव्हतं. बघता बघता महिना गेला. योगा योगाने कार्टातील लग्नादिवशी केतकीचे बाबा मुंबईला चार दिवसांच्या कामासाठी म्हणून गेले होते. बबिताने आजपर्यंत नेहमीच नवऱ्याचा शब्द, आज्ञा म्हणून पाळला होता. पण सध्या मात्र लेकींच्या सुखापुढे नवऱ्याच्या विचाराला झुगारावे लागत होते.

सर्वजण मिळून कोर्टात जाऊन लग्न करून आले.घरातच केतकीच्या आईने पुरणपोळीचा स्वयंपाक केला होता. सर्वांनी यथेच्छ जेवण केले. लग्न झाले म्हणजे रजनीश बरोबर केतकी जाणे क्रमप्राप्त होते. परंतू बाबा आल्यावरचं मी येते असे तिने जाहीर केले. रजनीशच्या घरातल्यांना मुलाचे लग्न धुमधडाक्यात व्हावे असं वाटत होतं. नंतर रिसेप्शन द्यायचं ठरविलं. बाबा जेव्हा मुंबई वरून आले, तेव्हा ते चिडले. प्रत्येकाची त्यांनी हजेरी घेतली,शेवटी त्यांनी तू या घरातून बाहेर निघून जा. अशा परखड शब्दात मुलीची पाठवणी केली. त्यांनी केतकीला बऱ्याच गोष्टींची जाणीव करून दिली. तिच्या मागे दोन बहिणी आहेत, त्याचा तू विचार केलास का असं विचारले. आम्ही केलेल्या संस्काराचं काय आणि बरंच काही.

परंतू तिचं लग्न कितीवेळा मोडले. त्यामुळे तिची झालेली मन:स्थिती याचा ते विचार करत नव्हते. शेवटी त्यांनी तू मला तुझे तोंड दाखवू नकोस. या घराचा संबंध तुटला असे सांगून जवळ जवळ घरातून बाहेर काढले. आज ना उद्या काका सुधारतील अशी आशा रजनीशसह सर्वांनाच होती.

हळूहळू दिवस जात होते. एकातरी सणाला केतकीला घेऊन यावे असे बाबांना वाटत नव्हते. बबिताने समजूत घालण्याचा प्रयत्न केला. तर उलट तिलाच बरंच काही ऐकावं लागलं. लेकीला जाऊन भेटावे, तिची खुशाली विचारावी , असं बबिताला वाटे. पण त्यांना वडील म्हणून कर्तव्याची जाणीव नव्हती. त्यांना त्या गोष्टींची गरजही वाटत नव्हती. उलट कोणी रजनीश विषयी बोलले तर त्यांना अपमान झाल्यासारखे वाटे. ऑफिसमध्ये केतकीच्या सास-यांना पाहून तर जखमेवर मीठ चोळल्यासारखं वाटे. सुगंधा व सरिताच कसं होईल असं त्यांच्या मनात येई.

केतकीला सोलापूरला येवून एक-दीड महिना झाला होता. सणाला मी माहेरी जावू शकत नाही, म्हणून खास पुण्याहून सोलापूरला सासरी येई.तिचे मन पुण्यात रमत नसे. लग्न झाल्यावर ती बाबांच्या परस्पर जाऊन आईला भेटून आली होती. तिच्या सासरच्या घरी आई, बहिणी येवून जात. एक बाबांच्या मनातील राग सोडला तर बाकी सर्व खूप छान चाललं होतं. आई, बहिणी, सासू, सासरे, नणंद या सर्वांना रजनीशच्या वाढदिवसाचे आमंत्रण देऊन केतकी पुण्याला परतली. आठ दिवसांनी वाढदिवस होता. लग्नाला अवघे तीनच महिने झाले होते. वाढदिवसाचे कारण ठरवून राहिलेली लग्नाची पार्टी देण्याचा जोरदार बेत त्या दोघांनी आखला. हॉटेल बुक केले. दोघांनी स्वत:बरोबर घरच्या सर्वांना कपडे घेतले. बाकी सर्व तयारी झाली. वाढदिवसाच्या आधी दोन दिवस सर्वजण पोहोचले. सर्वांनी मिळून राहिलेली सर्व तयारी केली. केतकीने बाबांना धाडसाने फोन लावून येण्याविषयी विनंती केली.

पण बाबा केतकीला एकही शब्द बोलले नाहीत. तरीही केतकीला वाटत होते बाबांनी आता राग सोडून द्यावा. वाढदिवसादिवशी रजनीशच्या आईने त्याला चोळून अंघोळ घातली,औक्षण केले. त्याच्या आवडीचा स्वयंपाक करून सर्वजण देवाला जाऊन आले. जेवण करून दुपारी थोडी विश्रांती घेतली. संध्याकाळी पाच वाजताच्या कार्यक्रमाला सर्वजण आवरून चारलाच निघाले. रजनीशनकडे फोर

व्हिलर व टू व्हिलर होती. त्याला आणखी बर्थ डे केक आणायचा होता म्हणून केतकी आणि रजनीश केक घेवून हॉटेलमध्ये पोहोचणार होते. बाकी सर्वांना फोर व्हिलरमध्ये पाठवून ते दोघे केक आणायला गेले. तसा रजनीश केतकीला हॉटेलमध्ये पोहोचायला उशीर झाला होता. तो गाडी वेगाने चालवू लागल्यावर केतकीने आपण अर्धा तास उशिरा पोहोचू पण घाई करू नको, म्हणून त्याला गाडीचा वेग कमी करायला लावला. केक घ्यायला ती दुकानात गेली.

तिने सांगितल्याप्रमाणे फुलाच्या आकाराचा सुंदर केक त्यावर बदाम अन् रजनीशचे नाव लिहीले होते. तिला केकवरील डेकोरेशन खूप आवडले. ती केक पहात असतानाच गाडीच्या ब्रेकचा खूप जोरात आवाज आला. ती दुकानदाराला म्हणालीही,‘ काय गाड्या चालवतात आजकाल?’

तिने मेणबत्ती आणि स्प्रे कसला घ्यायचा म्हणून रजनीशला विचारण्यासाठी त्याच्या दिशेने तोंड केले. रस्त्यावर गर्दी होती.या सर्व गर्दीतून रजनीश दिसणार नाही म्हणून तिनेच कमळाच्या आकाराची मेणबत्ती, वाढदिवसाचा केक, स्प्रे असे सर्व साहित्य घेऊन तिने पैसे दिले व रस्ता ओलांडून ती पुढे येऊ लागली. रजनीश गाडी इथेच लावून बाजूला उभा होता. या गर्दीत काय झाले ते बघायला गेला असला तरी गाडी कुठे ठेवली का तो तिला विसरून एकटाच हॉटेलकडे गेला? रजनीश खरंच नुसता गडबड करतो. असं मनाशीच म्हणून सामान एका हातात सावरत तिने फोन लावला.

तिच्या ओळखीची रिंगटोन जवळच कुठेतरी वाजतेय असं तिला वाटलं. रजनीश फोन उचलत नव्हता. ती धाडसाने गर्दीत शिरली. ती सर्व उभ्या असलेल्या व्यक्तींच्या तोंडाकडे न्याहाळत होती. ‘ रजनीश, रजनीश’ म्हणून हाका मारत होती. शेवटी तिच्या पायाला बूट लागला म्हणून तिने खाली पाहिले. एक बूट तिच्या पायाजवळ पडला होता आणि दुसरा रजनीशच्या पायातच होता. तिचे लक्ष गाडी

आणि गाडीजवळ पडलेल्या तिच्या प्रियाकडे गेले. अन् मग आसमंतात ‘रजनीश....’ असा किंचाळीचा जोरदार आवाज आला. क्षणभर वीज कडाडल्याचा भास झाला. तिचा रजनीश रस्त्यावर रक्ताच्या थारोळयात पडला होता आणि त्याचे डोळे उघडेच होते. हात पसरून जणू तो तिला बोलावत होता.

तिच्या हातातून केक, मेणबत्ती, स्प्रे सगळं अस्ताव्यस्तं पडलं होतं. दोन सेकंद काय होतंय हे कळायच्या आत केतकी चक्कर येऊन त्याच्याच शेजारी पडली. गर्दीला सरकवत पोलिस आले,त्यांनी केतकी व रजनीशला दवाखान्यात पोहोचवले. केतकी थोड्यावेळाने शुध्दीवर आली. तोपर्यंत घरच्या लोकांनी या दोघांना हॉटेलकडे यायला उशिर झाला म्हणून त्यांच्या फोनवर फोन केले.पोलिसांनी त्यांच्या मदतीने सर्वांना हॉस्पिटलमध्ये बोलावून घेतले. झाला प्रकार सर्वांच्या लक्षात आला. तोपर्यंत रजनीश सर्वांना सोडून दूर निघून गेला होता.

हे सर्व केतकीला सांगायचे कसे? असा प्रश्न सर्वांना पडला होता पण तरीही हे सत्य स्विकारावेच लागणार होते.रजनीश जेव्हा केतकीची वाट पहात रस्त्याच्या कडेला गाडीवर बसला होता तेवढ्यात मागून वेगात येणाऱ्या ट्रकने रस्त्यावर आडव्या आलेल्या म्हाताऱ्या माणसाला वाचवण्यासाठी गाडी एका बाजूला वळविली आणि या सर्व गोंधळात रजनीश गाडीसह उंच उडून लांब फेकला गेला. तो पडताना डोक्यावर मागे पडला. त्यामुळे तो वाचू शकला नव्हता. अपघात पहाणारा प्रत्येकजण हळहळत होता. केतकीला तर इतका जबरदस्त धक्का बसला की, आज तिच्या रजनीशचा लग्नानंतरचा पहिला वाढदिवस. रजनीशशिवाय जीवन जगायचे ही कल्पना पटेनाशी झाली होती. तिला रडून रडून सारखी चक्कर येऊ लागली. उध्वस्त जीवन आणि तेही प्रियाशिवाय? तिच्यासाठी कित्येक वर्ष वाट पहाणारा तिचा रजनीश. जोरजबरदस्ती न करता हळुवारपणे प्रेमाचे नातेसंबंध उलघडून दाखविणारा तिचा सखा, तिच्यासाठी धाडसाने सर्व करणारा तिचा पती.

रजनीश एवढा एकच शब्द ती तोंडाला फेस येईपर्यंत म्हणत होती. तिला सावरणे सर्वांनाच अवघड होते.

महिना उलटून गेला होता पण तरीही केतकीच्या मनावरील जखमा नुकत्याच झालेल्या जखमांप्रमाणे ओल्याच होत्या. तिला अपघातानंतर सासु-सास-यांनी सोलापूरला आणले होते. दहा-पंधरा दिवसांनी आई-वडील, बहिणी आल्या. त्यावेळेस केतकीने ठामपणे बाबांना सांगितले,

'बाबा, आता रजनीशचे घर म्हणजे माझे घर. मी माहेरी चुकूनही रहाण्यासाठी येणार नाही. माझा रजनीश गेल्यावर तुम्ही मला न्यायला आलात? मी माझ्या घराचा उंबरठा ओलांडणार नाही. मी आलेच असते तर रजनीश असताना जोडीने माहेरी काही वेळासाठी पाहुणचार घेण्यासाठी आले असते.'

ती माहेरी गेलीच नाही. दोन-तीन महिन्यानंतर ती पुण्याला तिच्या घरी परतली. रिनाच्या शिक्षणामुळे तिचे सासू-सासरे पुण्यात राहू शकत नव्हते. तिने या सर्व संकटावर मात करून जीवन जगायचे ठरवले होते. पुण्यामध्ये राहून जॉब करत करत ती शिक्षण घेत होती. तिच्या हुशारीमुळे तिला स्कॉलरशिपही मिळाली. तिचे आता बऱ्यापैकी चालले होते पण तरीही रजनीशची आठवण आली नाही असा एकही क्षण नव्हता. तिला रजनीशचा वाढदिवस प्रत्येक वर्षी आठवत रहाणार होता. तीन महिन्यातील सहवास तिने अत्तरासारखा मनाच्या कुपीत भरून ठेवला. त्या आठवणींच्या सुगंधावरच जीवन जगायचे तिने ठरवले होते. कोणाचाही आधार न घेता, दुबळे न होता. आज तिला अथक परिश्रमानंतर परदेशी जायची संधी मिळाली होती. पण ती एकटीच जाणार होती. आज रजनीश असता तर.... या आठवणींसरशी तिच्या गालांवरून अश्रू ओघळू लागले.

## लेखिकेचा परिचय



नाव- सौ. आशा अरूण पाटील

शिक्षण - एम ए डी एड डी एस एम

छंद - लेखन, वाचन, कथाकथन, नाट्याभिनय

व्यवसाय- शिक्षिका

लेखन साहित्य - १. आठवणींचा पाऊस ( काव्यसंग्रह) २. बिल्वदल ( काव्यसंग्रह)

३. शूरवीर ( बालकथासंग्रह) ४. बंटीची फजिती ( बालकथासंग्रह) ५. अमृतफळ ( बालकथासंग्रह) ६. आत्मनाद ( कथासंग्रह)

आगामी-- १. शेवंताबाई ( विनोदी कथासंग्रह)

२. स्वआरंभ ( बालकथासंग्रह)

३ .चमचमतारा ( बालगीत संग्रह) ४. आस परिवर्तनाची ( लेख संग्रह)

समावेश -१ राज्यशासनाच्या हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांकरिताच्या इयत्ता सातवी सुलभ भारती मध्ये समावेशित पाठ ' वाचनाचे वेड'

२ मालकीण कथा- सोलापूरी कथा( कथासंग्रह) - संपादक- योगीराज वाघमारे, गवळी प्रकाशन , इस्लामपूर

३ जीवन - कविता, शब्दधन ( प्रातिनिधिक काव्यसंग्रह) - संपादक- दिगंबर शिंदे- यशोदीप पब्लिकेशन पुणे.

४ रितेपण- कविता- रत्नप्रिया प्रकाशन-

संपादक- आनंद घोडके- सोलापूर

५ शिवबा ( कविता) शिवकाव्याभिषेक ( प्रातिनिधिक काव्यसंग्रह) रत्नप्रिया प्रकाशन सोलापूर - संपादक- भाऊसाहेब कोळेकर६) आत्मनाद (कथासंग्रह)

** आगामी प्रकाशन-

१) शेवंताबाई (विनोदी कथासंग्रह)

२) चमचम तारा (बालगीत संग्रह )

३) आस परिवर्तनाची( लेख संग्रह)

४) स्वआरंभ (कथासंग्रह)

##समावेश- प्रातिनिधिक कथा, कविता संग्रह

१) मालकीण कथा- 'सोलापूरी कथा' या कथासंग्रहात समावेश गवळी प्रकाशन इस्लामपूर

२) जीवन- कविता-'शब्दधन' - यशोदीप पब्लिकेशन पुणे

३) रितेपण-कविता-'क्षितिज काव्यप्रेमींचे'रत्नप्रिया प्रकाशन सोलापूर

पुरस्कार-

१) 'आठवणींचा पाऊस' काव्यसंग्रहास क्रांतीगुरू लहुजी साळवे राष्ट्रीय प्रतिष्ठान महाराष्ट्र यांचेतर्फे अण्णाभाऊ साठे उत्कृष्ट वाङ्‌मय पुरस्कार

२)'बिल्वदल' कवितासंग्रहास अंकुर साहित्य संघ, अकोला यांचा बहिणाबाई चौधरी काव्य पुरस्कार

३) 'अमृतफळ' कथासंग्रहास -अंजनी साहित्य प्रतिष्ठानचा -बाबूराव वाघमोडे स्मृती कथा पुरस्कार

४) पत्रलेखन पुरस्कार- सौ. शोभा माळवेपत्रलेखन पुरस्कार

५) विवेक कला व साहित्य मंडळ, उमरगा, उस्मानाबाद  कथालेखन स्पर्धा

६) सोलापूर जिल्हा वृत्तपत्रलेखक मंच पुरस्कार -वृत्तपत्रलेखनाकरिता

७) अक्षर ग्रंथ पुरस्कार- हिराबाई नेमचंद निंबर्गीकर ग्रंथालय, सोलापूर

८) शिवांजली साहित्य गौरव पुरस्कार- साहित्य लेखनाकरिता ९) अ. भा. साने गुरूजी कथामाला उस्मानाबाद साहित्यसेवा

पुरस्कार

१०) सोलापूर महानगरपालिका विशेष प्रमाणपत्र  साहित्यलेखनाकरिता
*शैक्षणिक लेखन*

१) जीवन शिक्षण या शैक्षणिक मासिकात 'आत्मविश्वासाचे बळ' लेख प्रकाशित

२)किशोर  या शैक्षणिक मासिकात 'रखमा' ही कथा प्रसिद्ध

* सहभाग*

१)किशोर मासिकाकडून आयोजित लेखन कार्यशाळेत सहभागी

२)जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था वेळापूर यांचेकडून विभागीय कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून निवड@@ शैक्षणिक- १)जनसेवा शिक्षक संघटनेतर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार

२)अखिल भारतीय साने गुरूजी कथामाला- निरंजनकुमार उमाठे आदर्श शिक्षिका पुरस्कार

३) सिध्दसंग प्रतिष्ठान सोलापूर - आदर्श शिक्षिका पुरस्कार

४)लोकशाहीर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे स्मृती राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार

५) लोकमत सखी गौरव पुरस्कार-शैक्षणिक

६)राज्यस्तरीय पंढरी गौरव आदर्श शिक्षिका पुरस्कार

७)सोलापूर जिल्हा  वृत्तपत्र लेखकमंच तर्फेआदर्श शिक्षिका पुरस्कार

८) मिडटाऊन लायन्स क्लब सोलापूर तर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार

९)जंगम समाज विकास संस्था बार्शी तर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार

१०)एल्गार सामाजिक साहित्य परिषद पिंपरी चिंचवड,पुणे तर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला अर्धाकोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

ई साहित्यची पुस्तके

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.